


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २३४ ■ बुधवार, दि. ४ मार्च २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com



## विजय-रश्मिकाचे रिसेप्शन आज हैदराबादमध्ये....!

**हैदराबाद:** विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदानाचे रिसेप्शन आज हैदराबादमधील ताज कृष्णा हॉटेलमध्ये होणार आहे. या जोडप्याने २६ फेब्रुवारी रोजी उदयपूरमध्ये एका खाजगी समारंभात लग्न केले होते, ज्यात कुटुंब आणि जवळच्या लोकांसह केवळ २५० लोक उपस्थित होते. आता हे जोडपे हैदराबादमध्ये भव्य रिसेप्शन देत आहे, ज्यात हिंदी, तमिळ, तेलुगू, मल्याळम आणि कन्नड उद्योगातील अनेक मोठ्या व्यक्ती उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात अनेक मोठे राजकारणीही सहभागी होणार आहेत. विजय-रश्मिकाने रविवारी अधिकृत निवेदन जारी करत सांगितले आहे की, त्यांच्या रिसेप्शनमध्ये उच्च-प्रोफाइल व्यक्तींच्या उपस्थितीसाठी कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. हैदराबादच्या स्थानिक अधिकाऱ्यांशी संपर्क साधून अतिरिक्त सुरक्षा ठेवण्यात आली आहे. पाहुण्यांची यादी खूप मर्यादित करण्यात आली आहे. विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना २६ फेब्रुवारी रोजी राजस्थानमधील उदयपूरमध्ये विवाहबंधनात अडकले. त्या दोघांचे लग्न एका खाजगी समारंभात आयटीसी मोमेंटोस रिसॉर्टमध्ये झाले. लग्न दोन वेगवेगळ्या परंपरांनुसार पार पडले. सकाळी तेलुगू रीतीरिवाजांनुसार विवाह झाला, तर संध्याकाळी रश्मिकाच्या कोडवा परंपरेनुसार विधी पार पडले. रश्मिकाने लाल साडी आणि सोन्याचे दागिने परिधान केले होते, तर विजयने आयव्हरी धोती आणि लाल अंगवस्त्रम परिधान केले होते.

# राज्यसभेसाठी भाजपकडून महाराष्ट्रातील 4 नावं जाहीर



प्रतिनिधी ४ मार्च

**मुंबई :** राज्यसभेच्या निवडणुकीसाठी भाजपने महाराष्ट्रातील उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. रामदास आठवले, विनोद तावडे, रामदास वडकुते, माया इवनाते यांना भाजपकडून राज्यसभेची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

राज्यसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्रातून निवडल्या जाणाऱ्या ७ जागांसाठी भाजपने आपले उमेदवार जाहीर केले आहेत. भाजपकडून रामदास आठवले , विनोद तावडे , माया चिंतामण ईवनाते आणि रामराव वडकुते यांना उमेदवारी दिली आहे. महाराष्ट्रातील संख्याबळानुसार भाजपचे ४ उमेदवार हमखास निवडून येऊ शकतात. त्यानुसार भाजपने आपले उमेदवार जाहीर केले आहेत. कालच भाजपने इतर राज्यातील उमेदवार जाहीर केले होते. त्यावेळी महाराष्ट्रातून कुणाला उमेदवारी मिळणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या.

भाजपकडून सोशल इंजिनिअरिंग साधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मराठा, आदिवासी, ओबीसी आणि मागासवर्गीय समाजाला चारही उमेदवारांच्या माध्यमातून संधी देण्याचा प्रयत्न भाजपने केला आहे. सोबतच, यादीतून प्रादेशिक समतोल देखील राखण्याचा प्रयत्न भाजपने केल्याचं दिसून येतंय. विदर्भ, मराठवाडा, कोकणातील उमेदवारांना भाजपकडून संधी देण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील विधानसभेतले सध्याचे संख्याबळ पाहता, भाजपचे सर्वाधिक ४ उमेदवार निवडून येण्याची शक्यता. एकनाथ शिंदेंची शिवसेना १, अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस १ आणि महाविकास आघाडीची १ जागा या ठिकाणी निवडून येऊ शकते. संख्याबळानुसार चौथी जागा निवडून आणण्यासाठी भाजपला कसरत करावी लागेल. भाजपला चौथ्या जागेसाठी ३७ मते पूर्ण करताना काही अपक्ष आणि मित्रपक्षांच्या अतिरिक्त मतांची गरज भासेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीच्या गणितात माहीर मानले जातात. यापूर्वीही त्यांनी कमी संख्याबळ असताना उमेदवार निवडून आणून विरोधकांना धक्का दिलाय. त्यामुळे यावेळीही अपक्ष आमदारांची मदत घेऊन भाजप आपली चौथी जागा सुरक्षित करतील, असे जाणकार सांगत आहे. राज्यसभेसाठी भाजपने आज उमेदवार यादी जाहीर केली. महाराष्ट्रातून विनोद तावडे, रामदास आठवले, रामराव वडकुते आणि माया ईवनाते यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ७ जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार आहे.भाजपचे राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह यांनी ही यादी जाहीर केली. राज्यसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख ५ मार्च असून, ६ मार्च रोजी अर्जांची छानणी होईल. उमेदवारांना माघार घेण्यासाठी ९ मार्चपर्यंतची मुदत आहे.

### विनोद तावडे मुख्य प्रवाहात

विनोद तावडे महाराष्ट्र विधान परिषदेत विरोधी पक्षनेतेपद भूषविले आहे. त्यांनी शालेय शिक्षण, उच्च आणि तांत्रिक शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास तसेच मराठी भाषा (भाषा) आणि संस्कृती खात्याचे मंत्रिपदही भूषविले आहे. मात्र, त्यानंतर पुन्हा त्यांना पक्षसंघटनेत काम करण्याची संधी देण्यात आली. सध्या ते भाजपच्या महाराष्ट्र युनिटचे सरचिटणीस आहेत. अखिल भारतीय राष्ट्रीय कार्यकारी परिषदेचे सदस्य आणि १२ व्या आणि १३ व्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपच्या समन्वय समितीचेही ते प्रमुख सदस्य होते. आता राज्यसभेची उमेदवारी मिळाल्यामुळे ते पुन्हा एकदा संघटनात्मक कामातून मुख्य प्रवाहात आलेत.

### आठवले तिसऱ्यांदा 'आठवले'....!

रिपाइंचे रामदास आठवले यांना यंदा राज्यसभेची उमेदवारी मिळणार की नाही, याबाबत साशंकता होती. त्यांची पत्ता कट होणार, अशी शक्यताही वर्तवली जात होती. मात्र, भाजपने आपल्या कोट्यातून सलग तिसऱ्यावेळेस आठवलेंना राज्यसभेची संधी दिलीय. विशेष म्हणजे रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंगळवार ३ मार्च रोजी भेट घेतली होती. त्यांनी स्वतः एक्सवर पोस्ट करून याबाबत माहिती दिली होती. ते म्हणाले होते की, 'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी भेट घेऊन येऊ घातलेल्या राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सविस्तर चर्चा झाली. सध्याच्या राजकीय परिस्थितीचा आढावा घेत पुढील रणनीती, समन्वय आणि व्यापक राजकीय घडामोडींवर विचारविनिमय करण्यात आला.

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचे ऑडिट होणार!

प्रतिनिधी ४ मार्च

**पुणे :** राज्यातील सुमारे ४,३२५ शाळांच्या पोषण आहाराचे ऑडिट होणार आहे. शालेय शिक्षण विभागानया संदर्भात निर्णय जारी केला आहे. राज्यातील शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवी प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनाराबवली जाते, या योजनेचे आता ऑडिट केले जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील पाच टक्के शाळांचे ऑडिट केले जाणार असून यात विद्यार्थ्यांना आहार देण्यातील नियमित्ता, आहाराचे प्रमाण आणि पौष्टिकता, भांड्यांची उपलब्धता आदींसह अनेक बाबी तपासल्या जाणार आहे. या कामासाठी साधारणपणे २ कोटी ४२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची माहिती आहे.

# ऑटो उलटून एका मजुराचा मृत्यू, अनेक जण जखमी

प्रतिनिधी ४ मार्च

**अकोला :** जिल्ह्यातील पातूर तालुक्याच्या अतिदुर्गम गावंडगाव–पांगरताटी परिसरात धुलीवंदनाच्या दिवशी सकाळी भीषण अपघाताची घटना घडली. रोजंदारीसाठी बाहेरगावी निघालेल्या मजुरांच्या ऑटोसमोर अचानक मोकाट डुक्कर आल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन रस्त्याच्या कडेला उलटले. या अपघातात एका मजुराचा मृत्यू झाला असून अनेक मजूर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पांगरताटी येथील मजूर रोजप्रमाणे कामासाठी बाहेरगावी जात असताना गावंडगाव येथील पुलाजवळ त्यांच्या ऑटोसमोर अचानक डुक्कर आल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. ऑटो घसरून रस्त्याच्या कडेला उलटला. अपघाताची तीव्रता इतकी होती की काही प्रवासी रस्त्यावर फेकले गेले. अपघाताचा आवाज ऐकून स्थानिक ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढले व जवळच्या रुग्णालयात दाखल केले. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे. गंभीर जखमी राजू दामू जाधव, रा. पांगरताटी यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.



### मोकाट जनावरे, रोजगाराचा मुद्दा ऐरणीवर

दरम्यान, मोकाट जनावरांच्या वाढत्या त्रासाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. तसेच, ग्रामीण भागात रोजगार हमी योजनेच्या कामांमध्ये अनियमितता होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. मजुरांना स्थानिक पातळीवर काम उपलब्ध नसल्याने त्यांना बाहेरगावी जावे लागत असल्याचे चित्र असून प्रशासनाच्या कारभारावर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

# 'गणपती बाप्पा मोरया'चा गजर!

प्रतिनिधी ४ मार्च

**मुंबई :** फुजेरा आंतरराष्ट्रीय विमानतळावरून विमानाने मुंबईसाठी उड्डाण घेतले आणि सर्व प्रवाशांनी एकमुखाने 'गणपती बाप्पा मोरया'चा एकच गजर केला. आखाती देशांत पेटलेल्या युद्धामुळे दुबईत अडकलेल्या या प्रवाशांना महाराष्ट्रात कधी परतणार याची शाश्वती नव्हती. अशा परिस्थितीत दोन विशेष विमाने दाखल झाली व सर्वांचा अक्षरशः बांध फुटला.

१६४ प्रवाशांना फुजेरा येथे आणण्यात आले होते. येथून विशेष विमाने उपलब्ध करून दिली. फुजेरा युएईच्या पश्चिमेला असल्यामुळे दुबईची सीमा येथून लवकर सोडली जाऊ शकते. ही बाब लक्षात घेऊन येथूनच दोन विशेष विमानांनी प्रवाशांना मुंबईत परत आणण्याचा निर्णय घेण्यात आला. सोमवारी सायंकाळी दोन्ही विमाने फुजेरा विमानतळावर दाखल होताच प्रवाशांनी एकच जल्लोष केला. गणपती बाप्पा मोरयाचा गजर करत देवाचे शतशः आभार मानले, अशी माहिती सूत्रांनी दिली.

फुजेरा विमानतळावर सर्व प्रवाशांची विमानतळ संचालकांनी संपूर्ण व्यवस्था केली होती. त्यांचे खानपान तसेच इतर सर्व सोयीसुविधा त्यांना उपलब्ध करून दिल्या, अशी माहिती सूत्रांनी दिली. संचालकांनी सर्व प्रवाशांची व्यक्तीशः भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. तसेच धीर दिला. संचालकांनी उपलब्ध करून दिलेल्या सोयी-सुविधांबद्दल प्रवाशांनी त्यांचे आभार मानले.



### दोन विशेष विमानांनी प्रवासी मुंबईत दाखल

दुबई अडकलेल्या १६४ प्रवाशांना महाराष्ट्रात आणण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वखर्चाने दोन विशेष विमाने प्रवाशांसाठी उपलब्ध करून दिली. या विमानांद्वारे सर्वांना मुंबईत आणण्यात आले.

# वर्ग-२ च्या जमिनी होणार तत्काळ मालकी हक्काच्या!

## जुनी अट रद्द झाल्याने नागरिकांना दिलासा

प्रतिनिधी ४ मार्च

**पुणे :** राज्य शासनाने वर्ग २ च्या जमिनी मालकी हक्काने घेण्याची प्रक्रिया आता अधिक सोपी केली आहे. याआधी अशा जमिनी मिळाल्यानंतर किमान पाच वर्षे थांबावे लागायचे आणि त्यानंतरच आवश्यक नजराणा भरून मालकी हक्क मिळायचा, आता ही अट पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे शासकीय जमिनी मिळाल्यानंतर लगेच आवश्यक शुल्क भरून ती मालकी हक्काने मिळवता येणार आहेत. या निर्णयाचा फायदा शेती, वाणिज्य, औद्योगिक भाडेपट्ट्याने आणि कब्जे हक्काने गृहनिर्माण सोसायट्यांना आदींना होणार आहे. राज्य सरकारने १९६६ पासून भाडेपट्ट्याने, कब्जे हक्काने, गृहनिर्माण सोसायटी, औद्योगिक वाणिज्य अशा विविध कारणांसाठी नागरिकांना जमिनी दिल्या आहेत. पुणे शहरासह राज्यभरात अशा प्रकारे देण्यात आलेल्या जागांची संख्या मोठी आहे. या जमिनी सातबारा उताऱ्यावर धारणाधिकार वर्ग २ म्हणून दाखविल्या जातात. पूर्वी हस्तांतर करताना जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागायची आणि रेडी रेकनर दरानुसार किमान ५० टक्के ते ७५ टक्के नजराणा भरावा लागायचा. यामुळे जास्त वेळ लागत होता आणि नागरिकांचा खर्चही वाढत होता.

## राज्य सेवा मुख्य परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

प्रतिनिधी ४ मार्च

**पुणे :** राज्य लोकसेवा आयोगाने राज्य सेवा पूर्व परीक्षा-२०२५ चा निकाल २७ फेब्रुवारी रोजी जाहीर केला आहे. आता मुख्य परीक्षेसाठी एकूण १३९ पदांकरिता भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून, त्याचे वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. राज्य सेवा मुख्य परीक्षा २९ मार्च ते २६ एप्रिलदरम्यान पार पडणार आहे.

अर्ज सादर करण्याची आणि ऑनलाइन पद्धतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याची मुदत १४ मार्च २०२६ रोजी रात्री २३:५९ पर्यंत आहे. तर भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची मुदत १६ मार्च रोजी रात्री २३:५९ पर्यंत आहे. चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम मुदत १७ मार्च रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत आहे. पात्र उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असेही राज्य लोकसेवा आयोगाने म्हटले आहे. अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, नाशिक, नवी मुंबई व पुणे जिल्हा केंद्रांवर ही परीक्षा पार पडेल, असे आयोगाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

# 'होर्मुझच्या सामुद्रधुनीवर आमचा कब्जा', इराणचा दावा!



वृत्तसंस्था ४ मार्च

**नवी दिल्ली :** जगभरातील तेल आणि वायूच्या वाहतुकीकरता महत्त्वाचा असलेला जलमार्ग म्हणजेच होर्मुझच्या सामुद्रधुनीवर इराणने कब्जा मिळवला असल्याचा दावा इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने केला आहे.

फार्स वृत्तसंस्थेने दिलेल्या निवेदनात, गार्ड्स नेव्हीचे अधिकारी मोहम्मद अकबरजादेह म्हणाले, 'सध्या, होर्मुझची सामुद्रधुनी इस्लामिक रिपब्लिकच्या नौदलाच्या पूर्ण नियंत्रणाखाली आहे.' त्यांनी इशारा दिला की या मार्गावरून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही जहाजावर क्षेपणास्त्रांनी हल्ले केले जातील. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणविरोधातील कारवाया वाढवल्या आहेत. होर्मुझच्या सामुद्रधुनीत इराणने जोरदार हल्ले केलेले असतानाच आता या जलमार्गावर पूर्णपणे नियंत्रण मिळवले असल्याने जगभरातील जलवाहतूक ठप्प होण्याची शक्यता आहे. परिणामी जगभरातील तेल आणि इंधनाच्या साठा विस्कळीत होण्याची शक्यता आहे.

### अमेरिकेने दाव्याचे केले खंडन

दरम्यान, यूएस सेंट्रल कमांडचे ॲडमिरल ब्रॅड कूपर यांनी इराणचा दावा खोडून काढला. सर्व इराणी नौदल बुडवले असून १७ इराणी जहाज नष्ट करण्यात आल्याचा दावा अमेरिकेने केला आहे. 'अनेक दशकांपासून इराणी राजवटीने आंतरराष्ट्रीय जहाजांना त्रास दिला आहे. आज अरबी आखात, होर्मुझची सामुद्रधुनी किंवा ओमानच्या आखातात एकही इराणी जहाज जात नाही', असं अमेरिकेने म्हटलंय.

CLASSIFIED

**प्लॉट प्लॉट प्लॉट**

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट

पत्ता :- मौजे मालेगाव , हनुमानगडी समोर , छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8263923606 7757905649

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट

पत्ता:- देसाई लेआउट ,गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8468872250 8788432278

# प्रायव्हेट जेटचे भाडे आकाशा एवढे!

## श्रीमंतांमध्ये बिझनेस क्लाससाठी नव्हे तर जीव वाचविण्यासाठी स्पर्धा

वृत्तसंस्था ४ मार्च

**नवी दिल्ली :** श्रीमंतांमध्ये चढाओढ सुरु असल्यामुळे प्रायव्हेट विमान कंपन्या याचा फायदा घेत आहेत. युरोपपर्यंतच्या एका छोट्या उड्डाणाचे भाडे आता साडेतीन लाख डॉलरच्या पलीकडे गेले आहे. श्रीमंत आता आपल्या त्या लक्झरी मालमत्ता सोडून युरोपला जाण्याच्या तयारीत आहेत, जेणेकरून जीव वाचवता येईल. सध्या गल्फच्या आकाशात बिझनेस क्लास सीटांसाठी नव्हे, तर जीव वाचवणाऱ्या 'प्रायव्हेट टेक-ऑफ' साठीच स्पर्धा सुरू आहे.

काल पर्यंत जे आखाती देशांतील आलिशान हॉटेल्समध्ये शॅंपेनचा घोट घेत श्रीमंत लोक मजा मारत होते, आज त्यांच्या हातात दारु नाही तर प्रायव्हेट सिक्युरिटी कंपन्यांचे नंबर आहेत. मध्य पूर्वेत अमेरिका-इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू झालेल्या युद्धाने गल्फमधील 'गर्भश्रीमंतां' झोप उडवली आहे. जसा तेहरानने इस्त्रायल-अमेरिकेला प्रत्युत्तर देण्यासाठी ड्रोन आणि मिसाइल्सची पाऊस पाडला, तसाच दुबई आणि अबू धाबीतील आलिशान व्हिलांमध्ये राहणाऱ्या अतिशय श्रीमंत लोकांमध्ये बोरिया-बिस्तर गुंडाळण्याची धावपळ सुरू झाली. हे दृश्य एखाद्या हॉलिवूड डिझास्टर फिल्मसारखे झाले. न्यूयॉर्क पोस्टच्या एका अहवालानुसार, या श्रीमंतांमध्ये भीतीचे वातावरण इतके आहे की, ते गल्फ सोडून जाण्यासाठी एका प्रायव्हेट जेटसाठी ३,५०,००० डॉलर (सुमारे ३.२ कोटी रुपये) पर्यंतची मोठी रक्कम त्वरित देण्यास तयार आहेत. प्रायव्हेट जेट ब्रोकरेज कंपनी विमान प्रायव्हेटचे सीईओ अमीरह नरन यांनी सांगितले की, सध्या या श्रीमंतांकडे त्यांच्या महागड्या गाड्या आणि हिरे मागे सोडून पळून जाण्याशिवाय दुसरा 'खरा पर्याय' उरलेला नाही. विमाने कमी आहेत आणि पळणारे जास्त. त्यामुळे भाडे दर तासाला वाढत आहे.



### पहिले १० तासांची रोड ट्रिप आणि नंतर युरोपचे तिकीट

हवाईतळांवर मलबे आणि स्फोटांच्या बातम्यांनी या श्रीमंतांना जमिनीवर उतरायला भाग पाडले आहे. आता हे श्रीमंत आपल्या कोट्यवधींच्या लॅम्बोर्गिनी आणि फरारी गाड्यांमध्ये सौदी अरेबियापर्यंत १०-१० तासांची रस्त्याने प्रवास करत आहेत. का? कारण सौदी सध्या त्यांच्यासाठी ती खिडकी आहे जिथून ते सुरक्षितपणे युरोपसाठी प्रायव्हेट चार्टर प्लेन पकडू शकतात. सुरक्षा फर्म अल्मा रिस्कचे इयान मॅककॉल यांनी सांगितले की, त्यांच्याकडे वैयक्तिक ग्राहक आणि कॉर्पोरेट घराण्यांच्या कॉल्सचा पूर आला आहे. प्रत्येकजण फक्त एकच प्रश्न विचारत आहे, 'कितीही पैसा घ्या, फक्त येथून बाहेर काढा!'

# अत्यंत क्लीष्ट, नियोजनबध्द व पूरावा नष्ट करण्याचे उद्देशाने केलेल्या खुनाच्या गुन्ह्याचा केला उलगडा

प्रतिनिधी ४ मार्च



**अमरावती:** अत्यंत क्लीष्ट, नियोजनबदध व पूरावा नष्ट करण्याचे उददेशाने केलेल्या खुनाच्या गुन्हयाचा उलगडा अमरावती शहर पोलिसांनी केला आहे.

२४ तासात गंभीर गुन्हा उघडकीस आणुन कौतुकास्पद कारवाई शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी केली आहे. ०१/०२/२०२६ रोजी पोलीस स्टेशन फ्रेजरपूरा हददीमध्ये छत्री तलाव परिसरातील जंगलातील एका विहीरीमध्ये एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह हा संशयास्पद स्थितीत मिळुन आल्याबाबतची माहीती नियंत्रण कक्षाला प्राप्त झाल्याने अमरावती आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकारी तसेच गुन्हे शाखेचे अधिकारी व अमंलदार यांनी घटनास्थळाला भेट दिली असता सदर मृत्यू हा संशयास्पद असल्याने वरिष्ठ अधिकारी यांनी सदर घटनेबाबत कसोशीने चौकशी करून मयताची ओळख पटवीण्याबाबत आदेशीत केले होते. सदर मृतकाची ओळख पटवीणे हे अत्यंत आव्हानात्मक असल्याने गुन्हे शाखेच्या पथकांनी पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा येथे दाखल मिसींग क्रमांक १३/२६ व गुप्तबातमीदारांना मयताचे फोटो दाखवून मयत हा अमर मोतीलाल व्यास वय ३४ वर्ष रा महादेवखोरी, अमरावती असल्याचे अवघ्या ४ तासात निष्पन्न केले. सदर घटनेबाबत पोलीस स्टेशन फेजरपूरा येथे मर्ग कं. २१/२०२६ कलम १९४ बि.एन.एस.एस अन्वये दाखल करण्यात आला होता. गुन्हे शाखेचे अधिकारी व अमंलदार यांनी घटनास्थळाला भेट दिली असता मृतकाचा मृतदेह पाहता हा घातपात असल्याचा संशय होता परंतू दिनांक ०२.०३.२०२६ रोजी मृतकाचा प्राथमीक शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाला असता मृत्यु हा साधारण तीन दिवस अगोदर झाला असून त्याचे मांडीवर व इतर ठिकाणी स्टॅबींग असल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदर अहवालावरून अकस्मात मृत्यू मध्ये पोलीस स्टेशन फ्रेजरपूरा येथे अज्ञात आरोपी विरूदध खूनाचा गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. सदर खूनातील अज्ञात आरोपीताचे नाव व पत्ता निष्पन्न करणे हे पोलीसांसमोर आव्हानात्मक होते तसेच मयत हा १०.०२.२०२६ रोजी पासुन मिसींग असल्याने त्याचा मृत्यु हा तेव्हाच झाला असल्याच्या संशयावरून तपास सुरू केला. तपासात कोणताही तांत्रिक पुरावा अथवा सिसीटीव्ही फुटेज प्राप्त नसल्याने तपासात अडथळा येत होता. मृतक हा ०९/०२/२०२६ रोजी सुरत येथुन अमरावती येथे आल्याचे तपासात माहीती झाले त्याचे मित्र व नातेवाईक मंडळी सुदधा कमी असल्याने त्याचे बाबत अधीक माहीती काढून आरोपीतांना शोधणे आवाहानात्मक होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा

प्रतिनिधी ४ मार्च

**अमरावती :** ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवनात उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे आणि प्रमुख वक्ते अविनाश दुधे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. सुरज मडावी, अधिक्षक निलेश खटके आणि विधी अधिकारी नरेंद्र बोहरा प्रमुख उपस्थित होते.यावेळी प्रमुख वक्ते श्री. दुधे यांनी मराठी भाषेच्या समृद्ध वारशावर प्रकाश टाकला. त्यांनी मराठीला दोन हजार वर्षांहून अधिक काळाचा गौरवशाली इतिहास असल्याने तिला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळाला असल्याचे सांगितले. मातृभाषा हे संवादाचे सर्वात श्रेष्ठ साधन असून मराठीतून बोलणारी व्यक्ती जगातील कोणतीही भाषा आत्मसात करू शकतो. भाषेच्या संवर्धनासाठी प्रत्येकाने आपल्या उत्पन्नाचा किमान पाच टक्के भाग पुस्तके खरेदीसाठी खर्च करावा, असे आवाहन केले.

# मेळघाटातील आदिवासी बंधु-भगिनींसोबत माजी खासदार नवनीत रवी राणा यांनी केली होळी साजरी

प्रतिनिधी ४ मार्च



**अमरावती:** मेळघाटातील आदिवासी बंधु-भगिनींसोबत 'मेळघाटची बेटी' म्हणून भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनीत रवि राणा यांनी यंदाची होळी मोठ्या उत्साहात साजरी केली.

हरीसाल, धारणी, सुसर्डा, साद्राबादी, बासपनी, दिया, धारण माहु, धाकरमल, चाकर्दा, उतावली या गावा-गावांत आयोजित होळी दहनाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहून त्यांनी विधीवत पूजन केले आणि स्थानिक नागरिकांशी संवाद साधला.

मेळघाटातील विविध गावांमध्ये होळी दहनाच्या पारंपरिक कार्यक्रमात सहभागी होत नवनीत राणा यांनी आदिवासी संस्कृतीची समृद्ध परंपरा अनुभवली. यावेळी त्यांनी आदिवासी बांधवांसोबत पारंपरिक नृत्यातही सहभाग घेतला. ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक वेशभूषेत सादर करण्यात आलेल्या नृत्याचा त्यांनी मनमुराद आनंद घेतला.

या प्रसंगी बोलताना त्यांनी मेळघाटाशी असलेले आपले भावनिक नाते अधोरेखित केले. 'मी मेळघाटची बेटी आहे, आणि येथे येणे म्हणजे माझ्या कुटुंबात येण्यासारखे आहे,' असे सांगत त्यांनी सर्वांना होळीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण नेहमीच कटिबद्ध राहू, असे आश्वासनही त्यांनी दिले.

नवनीत राणा यांच्या आगमनाने मेळघाट परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. ग्रामस्थांनी त्यांचे जल्लोषात स्वागत करत फुलांच्या वर्षावात आणि घोषणांच्या गजरात त्यांना सन्मानित केले. 'मेळघाटची बेटी' म्हणून त्यांचे स्वागत करण्यात आले, ज्यामुळे कार्यक्रमाला विशेष भावनिक रंग चढला.

संपूर्ण मेळघाट परिसरात पारंपरिक पद्धतीने होळी साजरी होत असताना नवनीत राणा यांच्या उपस्थितीमुळे सणाचा उत्साह द्विगुणित झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

यावेळी नगराध्यक्ष सुनीलजी चोथमल , दुर्योधन जावरकर, दिनेश टेकाम, बादल कंचन, देवेंद्र टीप, निरज मालविय, प्रमोद शनवारे, उपेन बछले, राजेश मांगलेकर,अविनाश काळे, नागेश मुंडे, संतोष ठाकुर, गायत्री धोत्रे, रामदास धोत्रे, वैभव गोस्वामी, राम हेकडे, आनंद गौर, आसिफ उर्फ राजु, निखिल दुरतकर, रोहीत खडके, हर्ष आंबेडकर, बबलु वानखडे आदि गावातील शेकडो नागरीक उपस्थित होते.

# विश्वमांगल्य छात्र सभा तर्फे आयोजित 'शक्ती संवाद २०२६- भारतीय अभिव्यक्ती की खोज' अमरावती येथे संपन्न

प्रतिनिधी ४ मार्च

**अमरावती :** विश्वमांगल्य छात्र सभा तर्फे 'शक्ती संवाद २०२६- भारतीय अभिव्यक्ती की खोज' या एक दिवसीय परिषदेचे आयोजन श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात दिनांक २७ फेब्रुवारी रोजी संपन्न झाले. संपुर्ण विदर्भातील विविध महाविद्यालयांमधून एकूण ३२० विद्यार्थिनींचा सहभाग परिषदेकरिता होता. या परिषदेच्या उद्घाटन सत्राला विश्वमांगल्य छात्रसभा अखिल भारतीय संरक्षक तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ, २०१९ च्या मिसेस इंडिया युनिव्हर्स रूपल मोहता, विश्वमांगल्य सभा विदर्भ प्रांत संरक्षक अंजली देव, विश्वमांगल्य छात्रसभा अखिल भारतीय संयोजिका श्रुती देशपांडे, विश्वमांगल्य छात्रसभा विदर्भ प्रांत अध्यक्ष डॉ. स्मिता देशमुख या मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन तथा प्रतिमा पुजन करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोलताना हेमंत काळमेघ यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले तसेच विश्वमांगल्य छात्र सभेचे कार्य संपुर्ण देशात अधिक वृद्धिंगत होवो अशा शुभेच्छा देत, विद्यार्थ्यांना कार्य करण्यास प्रोत्साहन दिले. उद्घाटनानंतर झालेल्या दुसऱ्या सत्रात 'युवतींच्या जीवनात भारतीयतेचे चिंतन' या विषयावर श्रुती देशपांडे यांनी अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. युवतींच्या माध्यमातून येणाऱ्या पन्नास वर्षात कोणते भारतीय विमर्श (इंडीयन नॅरेटीव्ह) स्थापित केले पाहिजे यावर या सत्रात चिंतन झाले.

तसेच सांस्कृतिक नेतृत्व करणाऱ्या युवतींची गरज आज समाजाला आहे हे त्यांनी प्रतिपादित केले. तिसऱ्या सत्रात 'गर्ल्स पार्लमेंट' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या सत्रात विद्यार्थिनींनी भारतीय संस्कृती, कुटुंबव्यवस्था, निसर्गसंवर्धन, भारतातील प्रेरणादायी कथा तसेच सामाजिक जबाबदारी यावर आपले स्पष्ट व अभ्यासपूर्ण विचार मांडले. विद्यार्थिनींच्या प्रभावी सादरीकरणामुळे सत्रात सशक्त संवाद घडून आला. कार्यक्रमाच्या समारोपीय सत्रासाठी बियाणी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका प्राची अग्रवाल उपस्थित होत्या. युवतींची संसद तसेच मागील दोन आठवड्यांत आयोजित करण्यात आलेल्या 'रीलोत्सव' उपक्रमाचे बक्षीस वितरण या सत्रात करण्यात आले. या उपक्रमातून भारतीय संस्कृती, कुटुंबसंस्था व जीवनमूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थिनींमध्ये भारतीय अभिव्यक्तिचा विकास, संस्कृती व मूल्यसंवर्धन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. संवादात्मक व सहभागात्मक पद्धतीने राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे विद्यार्थिनींना भारतीय परंपरांमागील वैज्ञानिक, तात्त्विक व सामाजिक दृष्टिकोन समजून घेण्याची संधी मिळाली. वंदे मातरम ने परिषदेची सांगता झाली.

# जिल्ह्यात महाराजस्व शिबीरात ९५ मंडळात कार्यक्रम महसूल सेवा आता थेट जनतेच्या दारी

प्रतिनिधी ४ मार्च

**अमरावती:** सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी राज्य शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाचा पहिला टप्पा राबविण्यात येणार आहे. पाच टप्प्यात प्रत्येक महसूल मंडळात एक कार्यक्रम याप्रमाणे ९५ कार्यक्रम घेण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

महाराजस्व अभियान मार्च ते मे या कालावधीत महसूल मंडळ आणि नगर परिषद, नगर पंचायत स्तरावर राबविले जाणार आहे. या अभियानात महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. या शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना एकाच दिवसात सेवा देण्यात येणार आहे. यात प्रलंबित आणि विवादग्रस्त फेरफार प्रकरणांचा तात्काळ निपटारा करणे, सातबारामधील चुका दुरुस्त करणे आणि डिजिटल सातबारा व आठ अ उतारे उपलब्ध करून देणे, उत्पन्न, रहिवासी, जात आणि नॉन-क्रीमीलेअर यांसारखी महत्त्वाची प्रमाणपत्रे वितरीत करणे, अकृषिक परवानगीबाबत नवीन सुलभ तरतुदी, सनद प्रणाली रद्द झाल्याचे फायदे आणि सुधारीत तुकडेबंदी कायद्याची माहिती नागरिकांना दिली जाणार आहे.

## अमृत पेठ-२०२६ उद्योजक मेळाव्याला ६ मार्चपासून सुरवात

प्रतिनिधी ४ मार्च

**अमरावती :** स्थानिक उद्योजकांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि ग्राहकांना थेट उत्पादकांकडून खरेदीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे 'अमृत पेठ २०२६' या उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा दिनांक ६ ते ८ मार्च २०२६ या कालावधीत शहरांतील जाधव पॅलेस येथे संपन्न होणार आहे.

## भानखेडा तलावात दोन युवकांचा बुडून मृत्यू; गुन्हा नोंद, पोलिसांचा तपास

प्रतिनिधी ४ मार्च

**अमरावती:** अमरावती शहरातील भानखेडा परिसरातील तलावात दोन युवक बुडाल्याची दुर्दैवी घटना रविवारी सायंकाळी घडली. या प्रकरणी पोलिसांत फिर्याद नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शुभम उके (वय १८ वर्षे) आणि कार्तिक राऊत (वय अंदाजे १९-२० वर्षे) हे दोघे मित्र भानखेडा परिसरातील दुर्गामाता मंदिरामागील तलावाजवळ गेले होते. अंघोळीसाठी तलावात उतरल्यावर दोघांचा पाण्याचा अंदाज चुकला आणि ते खोल पाण्यात गेले. पोहता न आल्याने ते बुडाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि बचाव पथकाने तत्काळ धाव घेतली. रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम राबविण्यात आली. तलाव परिसरात मोठ्या प्रमाणात गाळ आणि अंधार असल्याने शोधकार्य करताना अडचणी निर्माण झाल्या. अखेर दोन्ही युवकांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.या घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली आहे. दोन्ही युवकांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला असून नातेवाईक व मित्रपरिवाराने हळहळ व्यक्त केली आहे.

## जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयात 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहात साजरा

प्रतिनिधी ४ मार्च

**दर्यापूर:** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित स्थानिक जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय येथे थोर शास्त्रज्ञ सी. वी. रमन यांच्या स्मृतीत 'राष्ट्रीय विज्ञान दिन २०२६' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी हा कार्यक्रम 'विज्ञानातील महिला: विकसित भारतासाठी उत्प्रेरक' या संकल्पनेवर आधारित होता. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांनी केले तर उद्घाटन प्रसंगी विज्ञान विभाग प्रमुख डॉ. विजय एलकर, डॉ. अनिल सोमवंशी, डॉ. पंकज कास्टे मंचावर उपस्थित होते. या विज्ञान



उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग होता . शहरातील विविध शाळांमधील सुमारे ३५० विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाला भेट दिली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी तयार केलेले विविध प्रयोग आणि उपक्रम पाहून शालेय विद्यार्थी भारावून गेले होते. महाविद्यालयातील विविध विभागांनी विज्ञानातील संकल्पना सोप्या पद्धतीने मांडण्यासाठी विविध उपक्रम राबवले. रसायनशास्त्र विभागात अंतर्गत रासायनिक अभिक्रियांचे मनोरंजक प्रयोग दाखवण्यात आले. प्राणीशास्त्र विभागाने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोगांसह 'स्पायडर लॅब'ची सफर घडवून आणली. भौतिकशास्त्र विभागातर्फे नूतनीकरणक्षम ऊर्जा आधारित माहिती आणि विज्ञान कथांवरील लघुपट दाखवण्यात आले. वनस्पतीशास्त्र विभागातर्फे औषधी वनस्पतींच्या बागेची सहल आयोजित करण्यात आली. गणित विभागात 'गणित, कला आणि सर्जनशीलता' या विषयावर पोस्टर प्रदर्शन भरवण्यात आले. सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे भारतीय आंबवलेले खाद्यपदार्थ, पोषण आणि परंपरा यावर सखोल माहिती देण्यात आली. संगणक शास्त्र विभागातर्फे कोडिंगच्या मूलभूत गोष्टी आणि संगणक प्रयोगशाळेची माहिती देण्यात आली. ग्रंथालय विभागात स्पर्धा परीक्षा आणि इतर अवांतर पुस्तकांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी खुले ठेवण्यात आले होते. विज्ञानाप्रती गोडी निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

## कार्यालय नगर परिषद, अकोट जिल्हा अकोला

### (ई-निविदा सूचना) तिसरी वेळ

नगर परिषद अकोट पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मार्फत मोकाट कुत्र्याची व्यवस्था करणेबाबत ई-निविदा दि. ०२/०३/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून सदरी निविदा Tender ID 2025 DMA_1212314_6 हे Http:-www.mahatenders.gov.in Portal यावर उपलब्ध आहे.

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद अकोट**

सिटी न्यूज सुपरफास्ट — खामगाव

## स्व. संजय ठाकरे पाटील यांच्या जयंती निमित्त विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी ४ मार्च



**खामगाव :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, जिल्हा परिषदचे माजी सदस्य तथा सकल मराठा सेवा संघटना व छत्रपती प्रतिष्ठानचे संस्थापक स्व. संजय ठाकरे पाटील यांच्या जयंती निमित्त ६ मार्च २०२६ रोजी विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वर्वप्रथम सकाळी ९ वाजता जिल्हा सामान्य रुग्णालय खामगाव येथे रुग्णांना फळवाटप, सकाळी १० वाजता लॉयन्स क्लब खामगाव द्वारा संचालित लॉयन्स अन्नछत्र येथे जिल्हा सामान्य रुग्णालयातील रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना भोजनदान, ११ वाजता जलंब नाका स्थित सकल मराठा सेवा संघटनेच्या कार्यालयासमोर वाटसरूंसाठी मोफत पाणपोईचे उद्घाटन, ११.३० वाजता स्व. संजयभाऊ ठाकरे पाटील बळीराजा आत्मसन्मान योजनेअंतर्गत आत्महत्याग्रस्त कुटुंबाला आर्थिक मदत, दुपारी १.३० वाजता रेल्वे स्टेशन येथे खामगाव अनाथ, अनवानी व्यक्तींना स्लिपर चप्पल वाटप करण्यात येणार आहे. तरी वरील कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सकल मराठा सेवा संघ, श्री छत्रपती प्रतिष्ठान, खामगाव, स्व. संजय ठाकरे पाटील चॅरिटेबल ट्रस्ट खामगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# युग धर्म पब्लिक स्कूलमध्ये मोठ्या आनंदात आणि उत्साहात होळी सण साजरा...!

प्रतिनिधी ४ मार्च



**खामगाव :** शाळेचे मुख्याध्यापक अनिरुद्ध अवचार यांनी मुलांना होळी कशी कधीपासून साजरी करतात याविषयी सविस्तर माहिती दिली. गोपाल अग्रवाल सर यांनी मुलांना व शिक्षकांना होळी या सणाच्या शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. पारंपारिक पद्धतीने पूजाअर्चा नैवेद्य ,तसेच पळसांची फुले ,एरंडेल ची फांदी याचे महत्त्व संगीता मॅडम यांनी सांगितले .सर्व मुलांनी शिक्षकांनी एकमेकांना रंग लावून सर्वांना होळीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. नंतर इयत्ता पहिलीच्या विद्यार्थी हिमांशू राठोड हिरण्यकश्यप व होलिका यांच्या विषयी सांगितले तसेच इयत्ता दुसरीची विद्यार्थी भाविका बोदडे भक्त प्रल्हाद यांच्या जीवनावर छान अशी गोष्ट सांगितली इयत्ता तिसरीचा विद्यार्थी रेयांश पाटील आणि श्रावणी यांनी भक्त प्रल्हाद यांच्या जीवनावर छान छान अशा गोष्टी सांगितल्या. पुनीत गांधी व आदर्श काचकुरे या दोघांनी कुठले गुण होळीमध्ये टाकावे हे सांगितले तसेच प्री प्रायमरी च्या मुलांनी काम, क्रोध ,मोह,मत्सर हे आळीपाळीने होळीमध्ये टाकले नंतर शाळेचे अध्यक्ष गोपाल अग्रवाल सर शाळेचे मुख्याध्यापक सर यांनी होळीची पूजा केली आणि होलिका दहन केले. तसेच सर्व शिक्षकांनी सुद्धा होळीची पूजा केली. व मोठ्या आनंदाने होळी हा सण साजरा केला. तसेच विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी एकमेकांना रंग लावून होळी हा सण मोठ्या आनंदात व उत्साहात साजरा केला. सर्वांनी होळीला प्रदक्षिणा मारून धुलीवंदन साजरे केले.

### जाहीर सूचना

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, वैशिष्टपूर्ण योजने अंतर्गत पेट्रोल पंप चौक ते पोलिस स्टेशन ते मिनार मस्जीद ते शिवाजी चौक व मिनार मस्जीद ते खोलेश्वर मंदिर ते जूना मंगरुळपीर रोड काँक्रीटीकरण रस्ता दुभाजक बांधकाम सुरु करण्यात आला आहे. आठवडी बाजार ते पेट्रोल पंपा पर्यंत रस्त्याचे खोदकाम सुरु केले असता रस्त्यालगतची एकूण ९ झाडे रस्त्यामध्ये येत असल्याने सदर झाडे तोडण्याची परवानगी मिळण्याकरीता कंत्राटदारानी अर्ज सादर केला आहे.

तरी ह्या बाबतीत आपली काही तक्रार व आक्षेप असल्यास ते लेखी स्वरुपात दिनांक ०९/०२/२०२६ पर्यंत हवा नगर पंचायत कार्यालयात सादर करावा त्यांना प्राप्त होणाऱ्या तक्रार व आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत बार्शिटाकळी**

# उज्वल पब्लिक स्कूलचे विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित



प्रतिनिधी ४ मार्च

**अकोला :** . कारंजा लाड येथील व्हर्सेटाइल एज्युकेअर सिस्टीमच्या वतीने आयोजित व्हीईएस राज्यस्तरीय कौशल्य स्पर्धा आणि व्हिईएस कौशल्य गौरव सोहळा १ मार्च रोजी कारंजा लाड येथे यशस्वीरीत्या पार पडला. या राज्यस्तरीय स्पर्धेत महाराष्ट्रातील ३० पेक्षा अधिक शाळांचा उत्स्फूर्त सहभाग होता. बोरगाव मंजू येथील उज्वल पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांना सन्मानित केले. १००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

त्यामध्ये समिक्षा बोचरे , पीहू ताले, शिवण्या गोवाडे, तसेच मुख्याध्यापिका उज्वला नरेंद्र सोनवणे व प्रशासकीय अधिकारी सौ निता राजेंद्र बोबडे यांचा सुद्धा सन्मान करण्यात आला.

ही स्पर्धा व्हिईएसच्या ब्रेन अँड स्कील डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत घेण्यात आली. यामध्ये फोनिक्स, अबॅकस, इंग्रजी मराठी हस्तलेखन, रुबिक्स क्यूब, फायनान्शियल लिटरसी आणि वैदिक गणित या कार्यक्रमांचा समावेश होता. विद्यार्थ्यांचे राज्यस्तरावर मूल्यमापन करण्यात आले तसेच त्यांच्या परिवर्तनाच्या प्रवासाची दखल घेऊन त्यांचा गौरव करण्यात आला

या सोहळ्यात विविध गटांमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले. या समारंभात कौशल्य प्रावीण्याचा गौरव करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ दरम्यान व्हिईएस कार्यक्रमांची उत्कृष्ट अंमलबजावणी केल्याबद्दल ३२ शाळांना 'स्कील स्कूल ऑफ महाराष्ट्र' हा प्रतिष्ठेचा प्रमाणपत्र सन्मान देण्यात आला. यामध्ये बोरगाव मंजू येथील उज्वल कॉन्व्हेंट आणि ज्युनिअर कॉलेज याशिवाय, शाळांमध्ये फायनान्शियल लिटरसी चा प्रसार करून स्टुडंट बँक उपक्रम राबवल्याबद्दल १४ शाळांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. उज्वल कॉन्व्हेंटला रूरल ट्रान्सफॉर्मेशन अवार्ड या विशेष गटांतर्गत जिल्ह्याच्या दुर्गम भागात कौशल्य शिक्षणाद्वारे उल्लेखनीय परिणाम साधणाऱ्या शाळांचा विशेष सन्मान करण्यात आला. उपस्थित शिक्षकांमध्ये रूपाली कडू, स्वाती जैन, अश्विनी माहुलकर, दिपाली देशमुख, प्रीती वाघमारे, शारदा देशमुख, स्मिता पाटील, मीना वानखडे , प्रशांत होणाले यांचा समावेश होता.

## शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेच्या राज्य अध्यक्षपदी संतोष कुटे यांची नियुक्ती

प्रतिनिधी ४ मार्च



**अकोला :** शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटनेच्या राज्य अध्यक्षपदी संतोष कुटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेत राज्यस्तरावर विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्यानंतर त्यांनी राज्य अध्यक्ष पदाची धुरा स्वीकारली आहे. त्यांच्या कार्याचा व्यापक अनुभव, नेतृत्वगुण आणि संघटनात्मक बांधिलकी यामुळे संघटनेला नवी ऊर्जा व दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## 'अमृत' तर्फे प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना

**अकोला :** सी-डॅक या नामांकित प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या 'अमृत' लक्षित गटातील उमेदवारांना प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती देण्याची योजना राबविण्यात येत आहे. पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्तीचा लाभ घेण्यासाठी 'अमृत' च्या अधिकृत संकेतस्थळावर ३१ मार्चपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करता येणार आहेत. महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) तर्फे राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील तसेच अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी ही योजना राबविण्यात येत आहे. जानेवारी व फेब्रुवारी २०२६ च्या बॅचमध्ये सी-डॅकमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जाणार आहे. प्रत्येक प्रशिक्षणासाठी कमाल २० लाभार्थ्यांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. अमृत लक्षित गटात ब्राह्मण, कायस्थ, कोमटी, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, वैश्य, नायर, नायडू, कम्मा, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगूनथर, गुजराती, ठाकूर, जाट, हिंदू नेपाली, भूमिहार, लोहाणा आणि कानबी या जातीतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

# अभिजात मराठी भाषेची पाळेमुळे वऱ्हाडाच्या मातीत सापडतात : डॉ.प्रतिमा इंगोले

प्रतिनिधी ४ मार्च



**अकोला :** अभिजात मराठी भाषेला अनेक शब्द वऱ्हाडी बोलीने दिले आहेत मौखिक वाङ्मयातून आलेल्या ओवींनी ते पुढील पिढ्यांपर्यंत हस्तांतरित केले आहेत मराठी भाषा समृद्ध होती आहे आणि राहील यात शंका नाही फक्त तिचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी आणि हा समृद्ध वारसा पुढील पिढ्यांपर्यंत हस्तांतरित करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजे असे गौरव उद्गार ज्येष्ठ वऱ्हाडी साहित्यिका डॉ.प्रतिमा इंगोले यांनी काढले. त्या कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी अध्यापक परिषद अकोला जिल्हा व कनिष्ठ महाविद्यालय मराठी शिक्षक महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

यावेळी मंचावर प्रमुख अतिथी म्हणून आर.एल.टी चे प्राचार्य चंद्रवंशी सर मराठी अध्यापक परिषदेचे अध्यक्ष प्रा.पांडुरंग चौधरी सर उपाध्यक्ष डॉ.लता थोरात मॅडम बेरार एज्युकेशन सोसायटीचे संचालक प्रा.राहुल महाजन सर उपस्थित होते. मराठी अध्यापक परिषद व महासंघाच्या वतीने भाषा गौरव दिनाच्या औचित्य साधून घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण देखील यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कनिष्ठ महाविद्यालय मराठी विषय शिक्षक महासंघाचे राज्य अध्यक्ष प्रा.सुनील डिसले सर यांची शुभेच्छापर मनोगत व्यक्त करणारी चलचित्रफीत यावेळी डिजिटल बोर्डवर उपस्थितांना दाखवण्यात आली. मराठी अध्यापक परिषदेचे सेवानिवृत्त प्रा.संजय म्हैसणे सर प्रा.डी.एस.राठोड सर यांचा सेवानिवृत्त झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रा.राहुल महाजन सर यांची बीजीई सोसायटीच्या कार्यकारिणी सदस्य पदी निवड झाल्याबद्दल व प्रा.डॉ.निलेश पाकदुणे सरांना आचार्य पदवी प्राप्त केली त्याबद्दल दोघांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश सातपुते सर यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.संजय गोळे यांनी मांनले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिषदेचे सचिव प्रा.अनिल शेलकर, प्रा.अमोल जती प्रा.निलिमा बेलखेडे, प्रा.सुनिता डाबेराव प्रा.गजानन डांगे व इतर सर्व पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# शिवाजी महाराज चौकाचे सौंदर्यीकरण करा

♦ छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव समितीची मागणी



प्रतिनिधी ४ मार्च

**हिवरखेड :** येथील स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौकाचे सौंदर्यीकरण करा, अतिक्रमण काढून महाराजांच्या प्रतिमेचे ज्या ठिकाणी पूजन करण्यात येते,या स्थळी महाराजांचे स्मारक उभारण्यात यावे अशी मागणी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव समितीच्या वतीने निवेदनातून नगरपरिषदला केली. अजय नवले, नितीन नादोकार, राहुल तायडे, अभिषेक डालके , ओम फोफसे यांच्या स्वाक्षरीने निवेदन नगराध्यक्षा सौ सुलभा दुतोंडे यांनी स्वीकारले. यावेळी गोरक्षक रवी गावंडे उपस्थित होते. या शिवाजी महाराज चौकाचा विकास व्हावा अशी मागणी या निवेदनातुन करण्यात आली.

# होळी व धूलिवंदन उत्सव उत्साहात साजरा

♦ ग्रहण असल्याने काहींनी नियम सुद्धा पाळले



प्रतिनिधी ४ मार्च

**हिवरखेड :** येथे २ फेब्रुवारीला उत्साहात होळी व ३ फेब्रुवारीला धुलीवंदन उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. धुलीवंदनाच्या दिवशी चंद्रग्रहण लागल्याने अनेकांनी नियम पाळले तर सकाळ पर्यंत लहान चिमुकल्यांनी रंगाचा उत्सव साजरा केला, कोरडा रंग रंगाचा, पळसाच्या फुलांचा रंग खेडले, होळीच्या दिवशी होळी पूजन करून होळी दहन करण्यात आली, रंगांचा रंग अनेक लहान मोठे, स्त्री, पुरुष रंग खेळले. , तर काहींनी ग्रहणाचे नियम पाळले. राम नाम जप संध्याकाळ पर्यंत करण्यात आला.

# ग्रामपंचायत कार्यालयात घोंगडी सभा संपन्न



प्रतिनिधी ४ मार्च

**आलेगाव :** जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात महसुली व इतर विभागांच्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याकरिता छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान राजस्व मंडळ आलेगावाला ७ मार्च रोजी आयोजित करण्यात येत आहे. शिबिरा दरम्यान योजनांची माहिती देण्याकरिता व नागरिकांकडून प्रश्न जाणून घेण्याकरिता तहसीलदार डॉ. राहुल वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत कार्यालयात घोंगडी बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीला सरपंच गोपाल महल्ले, माजी उपसभापती इमरान खान मुमताज खान, रमण जैन, सुभाष जैन, संजय गावंडे, इरफान भाई, सुरेश मूर्तडकर, सैय्यद इसा ठेकेदार, देवनाथ धाईत, जलालोद्दीन भाई, राजेश काळपांडे, दिलीप काळपांडे, निलेश कापकर, अमजद खान, शंकर लहामगे, आलेगाव येथील मोठ्या संख्येने प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. सदर सभेमध्ये तहसीलदार पातुर यांनी नागरिकांना त्यांच्या अडचणी मांडण्याकरता अर्ज नमुने वितरित केले. सदर अर्ज ग्राम महसूल अधिकारी कार्यालय आलेगाव येथे भरून सादर करण्याबाबत सुचित केले.

# माळी वैभव कार्यालयात पार पडला गुणवंतांचा सत्कार



प्रतिनिधी ४ मार्च

**अकोला :** येथील स्थानिक खारोन पुऱ्यातील मांळी वैभव कार्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला. माळी वैभव कार्यालय व दहीबुवा ग्रुपने आयोजन केले होते.

गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये वैष्णवी संतोष भुडके (एल एल बी), संतोषकुमार राऊत (आदर्श शिक्षक), डॉ. निशांत खिरोडकार (एमबीबीएस), डॉ. प्रांजली खिरोडकार (बीएएमएस), प्रज्वल भड (महावितरण विद्युत सहायक,), मयुर व्यवहारे (सेंट्रल रिजर्व्ह पोलिस), रोहित येणकर (सेंट्रल रिजर्व्ह पोलिस), प्रतीक रहाटे,(इंडियन आर्मी), श्रावणी वानखडे (खो खो), सात्विक भोपळे , आशिष व्यवहारे (क्लार्क आरोग्य विभाग)यांचा सत्कार करण्यात आला. या विद्यार्थांनी वेगवेगळ्या विषयात कामगिरी बजावली.

## निधनवार्ता

**देवीदास भोपळे**



**अडगाव :** येथील सामाजिक कार्यकर्ते देवीदास भोपळे यांचे निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, दोन मुली, नातवंड आप्तपरिवार आहे.

# हातरुण ते कारंजा रमजानपुर रस्त्यावरील खड्डे थातूरमातूर भरले

प्रतिनिधी ४ मार्च

**हातरुण :** हातरुण कारंजा रमजानपुर अतिरहदारी असलेल्या रस्त्यावर जीवघेणे खडडे पडले होते.त्या रस्त्यावरील खड्डे संबंधित प्रशासनाने नुकतेच भरण्याचे काम केले. परंतु सदर खड्डे हे निकृष्ठ पद्धतीने भरून बिले काढण्यासाठी काम केल्याचा आरोप प्रवाशांकडून होत आहे.

अंदुरा कारंजा सिंगोलीआदि खेडे गावांचे प्रवासी दळणवळण करीत असतात.तसेच रुग्णवाहिका नियमित रुग्ण घेऊन अकोला कडे फेऱ्या मारीत असते. आणि हा अतिरहदारीचा रस्ता पार उखडून गेल्याने सदर रस्त्यावर अनेक वर्षापासून मोठ मोठे जीवघेणे खड्डे पडले, त्यामुळे वाहन चालक प्रवाशांना जिवमुठीत घेऊन प्रवास करण्याची वेळ आली तसेच या मार्गावर खडडे वाचविण्याच्या प्रयं करतांना टुव्हिलर गाड्याचे अनेकअपघात झालेआहेत याबाबत विविध वृत्तपत्रातून संबंधित प्रशासनाला कळविले होते.त्या नुसार संबंधित प्रशासनाने झाग आले आणि गत महिन्यामध्ये सदर रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे अर्थात पॅचेस भरण्याचे काम ठेकेदार कडून करवून घेतले.परंतु संबंधित ठेकेदाराने, मार्गची साफ सफाई न करता न त्याचात डामर टाकता फक्त मोठी गिट्टी टाकुन त्याच्यावर कमि मात्रामधे डामर व लिकविट टाकुन खडडे भुजविन्या चे काम केले वअनेक खड्डे न भरता सोडून दिल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.आणि जे खड्डे भरण्यात आले त्यामध्ये बऱ्याच ठिकाणी फक्त मुरूम तर काही खड्ड्यांमध्ये चक्क माती टाकुण फक्त बिले काढण्यासाठी थातूरमातूर खड्डे भरल्याचा आरोप वाहन चालक आणि प्रवाशांकडून होत आहे.तरी संबंधित अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष दिले नसल्यामुळे असला प्रकार घडल्याचे बोलले जात आहे.

# कुटासा येथे रंगपंचमी उत्साहात साजरी



प्रतिनिधी ४ मार्च

**कुटासा :** येथे पारंपारीक पद्धतीने रंगपंचमी साजरी करण्यात आली छोट्या मुंलानी रंगाचा उत्सव पर्यावरणपूरक कोरड्या रंगा सोबत साजरा केला. तर यावर्षी पळसाच्या फुलाचा रंग तयार करुन एकमेकांना रंग लावुन रंगपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली तर काही ठिकाणी पर्यावरणपुरक मातीच्या रंगाला प्राधान्य देत डिजेच्या तालावर तरुणाई थिरकताना दिसुन आली. यावर्षी रंगपंचमीच्या दिवशी ग्रहण असल्याने महादेव व कृष्णाचा जप करुन रंगपंचमी चा उत्सव साजरा करण्यात आला.

# संत गजानन महाराज मंदिरात भागवत सप्ताह साजरा

प्रतिनिधी ४ मार्च

**बाळापूर:** येथील संत गजानन महाराज मंदिर अकोला नाका येथे श्रीमद् भागवत कथा सप्ताह उत्साहात साजरा झाला. श्री गजानन महाराज मंदिर सेवा समिती हरिपाठ मंडळ व आरती तथा महिला भजनी मंडळाच्या सहकार्याने श्रीमद् भागवत ज्ञान कथा यज्ञ उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाला.

भागवताचार्य राधिकाताई धबाले यांच्या कथेचा भक्तांनी सात दिवस लाभ घेतला तसेच दशरथ महाराज अवचार शेगाव, भास्कर महाराज टिकार बोरी अडगाव, हर्षल महाराज ढोरे शिवापूर, किशोर महाराज काळे तामसी, रूपालीताई आकुड बाल कीर्तनकार पळशी बुद्रुक, संतोष महाराज मनसुटे गुरुजी खामगाव, गोपाल महाराज टिकार बोरी अडगाव, राधिकाताई धबाले पारस यांनी सात दिवस किर्तन रुपी सेवा श्री गजानन महाराज चरणी व श्री गोपाल कृष्ण चरणी अर्पण केली. सातही दिवस मंदिरात भगवत भक्तांची प्रचंड गर्दी होती. सात दिवस बाहेरून आलेल्या संत मंडळींना, टाळकरींना शैलेश इंगळे, भीमराव आप्पा कांबेकर, मोहन उमाळे, गजानन भाऊ झाडे, कैलास धनोकार, संदीप शेजोळे यांनी अन्नदानाची सेवा दिली. सोपान महाराज निकम वरुड व पुरुषोत्तम पाटील लांडे यांच्या सर्व सहकाऱ्यांनी टाळकऱ्यांना सेवा दिली. शेवटच्या दिवशी भागवत ग्रंथाची पालखी भजनी दिंड्यांसह काढण्यात आली. काल्याचे किर्तन राधिकाताई ढबाले यांनी केले. महाआरती व महाप्रसादाने सांगता झाली. सातही दिवस वरुड, धनेगाव, सांगवी, कुपटा, बाभूळगाव येथील भक्तांनी विणेकरी व टाळकरी म्हणून सेवा दिली. भागवत ज्ञान कथा यज्ञ यज्ञाचा भक्तांनी लाभ घेतला.

# श्री बागाजी विद्यालयात पर्यावरणपूरक होळी व रंगपंचमी साजरी




वि प्रतिनिधी ४ मार्च

**अकोट :** रुईखेड येथे श्री बागाजी विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात पर्यावरणपूरक होळी उत्सव व रंगपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली.या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी प्रथम शाळेय परिसरातील स्वच्छता करून होळी साजरी करण्यात आली.सदर कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय हरित सेना समन्वयक विशाल मांडवे सर यांनी केले. विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक पद्धतीने कोरडे रंग वापरून व पळसाचे फुलांचे रंग तयार करून रंगपंचमी साजरी केली.या उपक्रमातून विद्यार्थ्यांना स्वच्छता, पर्यावरण संवर्धन व सणांचा सामाजिक संदेश यांचे महत्त्व पटवून देण्यात आले. सदर कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक निनाद मानकर, अनिता भराटे, किरण मानकर, वनिता सरोदे, संतोष काळे, विशाल मांडवे, मंजुषा साठे, अनिल ओखारे, प्रा.रूपेश गायगोले, प्रा.राहुल खंडारे, संगीता पन्नासे, संगीता नाथे, जानव्ही गाठेकर ,शिक्षकेतर कर्मचारी विठ्ठल फाळके, गजानन घुगे, अविनाश सुकोशे व त्याच बरोबर विद्यार्थी गण मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित राहून अभिवादन करण्यात आले होते.

# सिरसोलीच्या स्मशानभूमीत पेटवली कचऱ्याची होळी

प्रतिनिधी ४ मार्च



**अकोट :** गुरुवर्य सत्यपाल महाराज यांच्या मार्गदर्शनात गुरुवंदन सत्यशोधक बहुउद्देशीय संस्था तसेच शिरसोली गावांमधील युवक आणि तरुण कार्यकर्ते यांच्या संयुक्त विद्यमाने, ग्रामगीतेच्या विचारानुसार , स्मशानभूमी स्वच्छता करण्यात आली.त्यामधील काडी कचरा गोळा करून त्याची होळी पेटवण्यात आली .गावातील सर्व युवा मंडळींनी ही परंपरा अखंडित चालू ठेवली.

या उपक्रमामुळे, होळीसाठी होत असलेली वृक्षतोड थांबावी आणि ग्रामस्वच्छतेचा संदेश तरुण युवकांच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश आहे. कुठल्याही नवीन विचाराची सुरुवात स्वतःपासून करावी, असे सांगणारे सत्यपाल महाराज यांनी गेल्या पंधरा वर्षापासून ही परंपरा आपल्या शिरसोली या गावी सुरू केलेली आहे. यावेळी सप्त खंजेरी वादक ऋषिपाल महाराज अनासने, सुनील चिंचोळकर, राजेश भारसाकडे, भास्कर गिऱ्हे, सुमेध भारसाकडे, युवराज वानखडे, सक्षम अनासाने, विशाल अनासाने, श्रीतेष अनासाने, सोहम चिंचोळकर, संघर्ष इंगळे, अनिकेत दारोकार, सुजल तायडे यांच्यासोबत अनेक गावकरी मंडळी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. ४ मार्च २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# अन् बिबट्या विहिरीत पडला

प्रतिनिधी ४ मार्च

**रेस्क्यू टिमने दिले जीवदान**

**यवतमाळ :** जिल्ह्यातील नेर वनपरिक्षेत्रात असलेल्या बाणगाव येथील शेत शिवारात आज ४ मार्च रोजी सकाळी एक चिंताजनक घटना घडली. पिण्याच्या पाण्याच्या शोधात असलेल्या बिबट्याने एका शेतातील विहिरीत पडून आपले जीव वाचविण्याचा प्रयत्न केला. विहिरीत पडलेल्या बिबट्याने त्या ठिकाणी असलेल्या पाईपला घट्ट पकडले होते. या दृश्याने घटनास्थळी एकच गोंधळ उडाला.

बाणगाव शेत शिवारात विक्रम राठोड नामक शेतक-यांची शेती आहे. त्याच्या शेतातील विहिरीत बिबट्या पडला होता. आज सकाळी हा प्रकार उजेडात आला. घटनेची माहिती मिळताच नेर वनपरिक्षेत्रातील वनअधिकारी, वनकर्मचारी आणि रेस्क्यू टीम घटनास्थळी त्वरित पोहोचली. ग्रामस्थांनीही मोठ्या प्रमाणावर घटनास्थळी गर्दी केली होती. स्थानिक नागरिकांनी बिबट्याच्या मदतीसाठी पाणी आणि खाण्याचे पुरवठा करण्याचा प्रयत्न केला, मात्र वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी धाडसाने बिबट्याचे रेस्क्यू ऑपरेशन सुरू केले. रेस्क्यू टीमने कठोर प्रयत्नांनी बिबट्याला सुरक्षितपणे



बाहेर काढले. पाणी पिण्यासाठी बिबट्या विहिरीत पडला असावा, असे अंदाज वर्तवले जात आहेत. या घटनेनंतर वन्यजीव संरक्षणाची गरज आणि वन्यजीवांच्या जीवनासाठी अधिक संरक्षणात्मक उपाययोजना घेण्याची महत्त्वपूर्ण बाब पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरली आहे.

# रेल्वे कामाचा बोजवारा; बायपास रस्त्यावरील धुळीने नागरिक त्रस्त



प्रतिनिधी ४ मार्च

**दारव्हा :** शहरातील रेल्वे स्टेशन व पुलाच्या सुरू असलेल्या बांधकामामुळे बायपास म्हणून काढण्यात आलेल्या रस्त्यावर नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचा आरोप बहुजन मुक्ती पार्टीने केला आहे. धुळीचे ढग, खड्ड्यांचे साम्राज्य आणि दिशादर्शक फलकांचा अभाव यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दारव्हा शहरातून डोल्हारी मार्गे नेर तसेच दारव्हा–तळेगाव या मार्गांवर रेल्वेचे काम मागील दोन-तीन वर्षांपासून सुरू आहे. पर्यायी मार्ग म्हणून सिमेंट रस्ता तयार करण्यात आला असला तरी सुमारे २०० ते ३०० मीटरचा पट्टा सिमेंटविना राहिल्याने तेथे मोठ्या प्रमाणावर धूळ उडत आहे. त्याचबरोबर खोल खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

रात्रीच्या वेळी वाहनचालकांना मार्गदर्शन करणारे फलक नसल्याने अंधारात वाहन चालवणे धोकादायक ठरत आहे. "काम सुरू आहे" असे सूचना फलकही पुरेशा प्रमाणात नसल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे. यापूर्वी ऑगस्ट २०२५ मध्ये बांधकामस्थळी असलेल्या खड्ड्यात पडून चार मुलांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यामुळे प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी बहुजन मुक्ती पार्टीचे लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांनी केली आहे. रेल्वे प्रशासन, जिल्हाधिकारी तसेच पालकमंत्री यांनी या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन अपूर्ण रस्ता सुरळीत करावा, धुळीचा बंदोबस्त करावा, आवश्यक ते सुरक्षात्मक फलक लावावेत, अशी मागणी केली आहे. दरम्यान, संभाव्य अपघात टाळण्यासाठी संबंधित यंत्रणांनी त्वरित कार्यवाही करावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## हुमेरा फिरदौसचा पहिला रोजा पूर्ण

प्रतिनिधी ४ मार्च

**पुसद :** पुसद शहरातील मस्तान शाह चौक परिसरात राहणाऱ्या शेख इर्शाद यांची कन्या हुमेरा फिरदौस हिने अवघ्या सातव्या वर्षी रमजान महिन्यातील



आपला पहिला रोजा पूर्ण करून प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे. कडाक्याच्या उष्णतेत सुमारे १३ तासांचा रोजा पूर्ण करत हुमेराने जिद्द, संयम आणि श्रद्धेचे दर्शन घडविले. भीषण उकाड्यामुळे मोठ्यांनाही त्रास सहन करावा लागत असताना या चिमुकलीने उत्साह आणि समर्पणाने रोजा पाळला. तिच्या या धाडसी कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. बरकत आणि इबादतीचा पवित्र रमजान महिना सुरू असून अल्लाहची कृपा मिळविण्यासाठी सर्वजण प्रयत्नशील आहेत. या पवित्र महिन्यात लहान मुलेही श्रद्धा आणि उत्साहाने सहभागी होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पहिलीत शिक्षण घेणाऱ्या हुमेराने लहान वयात पहिला रोजा यशस्वीरीत्या पूर्ण करून कुटुंबाचा मान उंचावला आहे. काका शेख फाजिल यांच्यासह नातेवाईक आणि समाजातील विविध स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हुमेराच्या या प्रयत्नातून इतर मुलांनाही प्रेरणा मिळत आहे.

# 'कोऱ्या फाइल्स'समोर पालकमंत्र्यांचा संताप

प्रतिनिधी ४ मार्च



## बाभूळगावची आढावा बैठक अर्ध्यावर स्थगित

**बाभूळगाव :** तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी बोलावलेली २ मार्चची आढावा बैठक अधिकाऱ्यांच्या अपुऱ्या तयारीमुळे अर्ध्यावर स्थगित करण्याची वेळ आली. नगर पंचायत सभागृहात झालेल्या बैठकीत विभागनिहाय माहिती सादर करताना अनेक अधिकारी 'कोरी पाटी' घेऊन हजर झाल्याचे चित्र समोर आले. यावरून पालकमंत्री संजय राठोड यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला सुनावले.

बैठकीत विविध विकासकामांचा आढावा, शासकीय योजनांची अंमलबजावणी, तसेच रखडलेल्या प्रस्तावांवर चर्चा अपेक्षित होती. मात्र अद्ययावत आकडेवारी, प्रस्तावांची स्थिती आणि निधीविषयक तपशील याबाबत अधिकाऱ्यांकडे ठोस माहिती नसल्याचे उघड झाले. काहींनी तर आपल्या विभागातील प्रलंबित कामांची स्थितीही स्पष्ट करता आली नाही.

"नागरिकांच्या प्रश्नांबाबतची ही बेफिकीरी अस्वीकार्य आहे," अशा शब्दांत पालकमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली. बैठकीपूर्वी स्पष्ट सूचना देऊनही तयारी न करणे म्हणजे जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न असल्याची टीकाही करण्यात आली.

बैठकीस नगराध्यक्ष, नगरसेवक, विविध पक्षांचे पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते. रस्ते दुरुस्ती, स्वच्छता, क्रीडा संकुल, अभ्यासिका उभारणी, तसेच कृषी विभागाच्या कारभारामुळे झालेल्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी—अशा अनेक मुद्द्यांवर ठोस निर्णयाची अपेक्षा व्यक्त होत होती. मात्र अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे चर्चा पुढे सरकू शकली नाही. या प्रकारामुळे प्रशासनातील समन्वयाचा अभाव आणि कामकाजातील शिथिलता पुन्हा अधोरेखित झाली आहे. बैठका केवळ औपचारिकता ठरत असल्याची चर्चा शहरात रंगली असून, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का, हा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, संबंधित विभागांना संपूर्ण तयारीनिशी पुन्हा बैठक घेण्याचे निर्देश देण्यात आल्याचे समजते. मात्र अशा घटनांमुळे प्रशासनावरील विश्वासाला तडा जात असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# 'ऑपरेशन मुस्कान' : २९ मुलींचा शोध, ८२ बालके सुरक्षित

प्रतिनिधी ४ मार्च

**८२ बालकांना नवजीवन**

**यवतमाळ :** हरवलेल्या आणि अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलींच्या शोधासाठी राबविण्यात आलेल्या 'ऑपरेशन मुस्कान' मोहिमेत यवतमाळ जिल्हा पोलीस दलाने प्रभावी कामगिरी नोंदवली आहे. सन २०२४ पासून फेब्रुवारी २०२६ पर्यंत दाखल गुन्ह्यांतील एकूण २९ मुलींचा यशस्वी शोध घेण्यात आला असून, घराचा पत्ता विसरलेल्या व भरकटलेल्या ५३ मुला-मुलींनाही सुरक्षित स्थळी पोहोचविण्यात आले आहे. त्यामुळे एकूण ८२ बालकांना नवजीवन मिळाले आहे.

राज्यभर २० जानेवारी ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात आलेल्या 'ऑपरेशन मुस्कान' अंतर्गत अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष तसेच जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांनी विशेष शोध पथके तयार करून समन्वयाने मोहीम राबवली.

मागील काही वर्षांत अल्पवयीन मुली घरातून रागाच्या भरात निघून जाणे, प्रेमसंबंधातून फूस लावून पळवून नेणे अशा घटनांत वाढ झाली होती. या प्रकरणांमध्ये कलम १३७ (२) बीएनएस अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. वडकी, कळंब, दारव्हा, दिग्रस, महागाव, घाटंजी, पुसद, आर्णी, राळेगाव, बाभुळगाव, नेर, दराटी, खंडाळा, उमरखेड आदी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दाखल गुन्ह्यांचा शोध विशेष पथकांनी तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती व सोशल मीडियाच्या आधारे लावला. शोध लागल्यानंतर संबंधित मुलींचे समुपदेशन करून त्यांना पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. या कारवाईमुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळाला असून समाजात सुरक्षिततेचा संदेश गेला आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता व अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वीपणे पार पडली. हरवलेल्या व्यक्तींबाबत तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात माहिती देण्याचे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले.

# जी.एन.आझाद उर्दू अध्यापक विद्यालयात सराव पाठ सत्र

प्रतिनिधी ४ मार्च



**पुसद :** पुसद येथील नामांकित जी. एन. आझाद उर्दू अध्यापक विद्यालयातील डी.एल.एड. अभ्यासक्रमाच्या छात्र-अध्यापकांचे सराव पाठ (प्रॅक्टिस टीचिंग) सत्र नुकतेच उत्साहात आणि यशस्वीरीत्या पार पडले. शिक्षण क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभवाचा महत्त्वाचा टप्पा मानल्या जाणाऱ्या या उपक्रमामुळे भावी शिक्षकांना अध्यापनाच्या विविध पैलूंचा जवळून परिचय झाला.

या उपक्रमासाठी शहरातील विविध शाळांनी सहकार्य केले. जि. प. प्राथमिक व उच्च प्राथमिक उर्दू शाळा (आखिरत नगर), न. प. उर्दू प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा क्र. ३ (रहमत नगर), मनोहरराव नाईक उर्दू प्राथमिक शाळा (मधुकरनगर) तसेच जी. एन. आझाद उर्दू प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा (पुसद) यांनी छात्र-अध्यापकांना प्रत्यक्ष वर्गात अध्यापनाची संधी उपलब्ध करून दिली. संबंधित शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षकवृंदाचे विद्यालय प्रशासनाने आभार मानले.

सराव पाठादरम्यान छात्र-अध्यापकांनी विषयांचे सुयोग्य नियोजन करत अध्यापन साहित्याचा प्रभावी वापर केला. आधुनिक अध्यापन पद्धती, प्रश्नोत्तर तंत्र आणि विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग यावर विशेष भर देण्यात आला. यामुळे छात्र-अध्यापकांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

या उपक्रमामागे प्राचार्य खान हसनैन आकीब यांचे नेतृत्व लाभले. प्रा. निसार अहमद खान, प्रा. ताबिश अली आणि प्रा. इबान अहमद यांनी मार्गदर्शक म्हणून वर्ग व्यवस्थापन, फळा लेखन व शिस्त याबाबत छात्र-अध्यापकांना सखोल मार्गदर्शन केले. जवळपास महिनाभर नियमित पर्यवेक्षण करून त्यांनी अध्यापन कौशल्य विकसित करण्यासाठी परिश्रम घेतले. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही प्रशासकीय कामकाजात सहकार्य केले.

सांगता समारंभात मान्यवरांनी प्रत्यक्ष अध्यापन अनुभवाचे महत्त्व अधोरेखित केले. "सिद्धांताबरोबर प्रत्यक्ष वर्गातील अनुभव आवश्यक असतो," असे मत व्यक्त करण्यात आले.

# श्री नर्मदेश्वर महादेव देवस्थान सेवा समितीच्या वतीने वृक्ष पूजन, वृक्षरोपण व पर्यावरण पूरक होळी दहन

प्रतिनिधी ४ मार्च

**यवतमाळ:** येथील उमरसरा स्थित यशोधरा नगर येथील श्री नर्मदेश्वर महादेव देवस्थान सेवा समिती यांच्या वतीने यंदाची होळी पारंपरिक पद्धतीने साजरी करताना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. सणाचा आनंद साजरा करताना निसर्गाचे रक्षण करणे ही काळाची गरज ओळखून समितीने वृक्ष पूजन, वृक्षरोपण तसेच पर्यावरण पूरक होळी दहनाचा अभिनव उपक्रम राबविला.

या कार्यक्रमास पर्यावरणाचा व वनराईचा ध्यास घेतलेले प्रयासवनचे सचिव संदीपभाऊ शिवरामवार, नगर परिषदेच्या स्थायी समिती सदस्य सौ रेखाताई कोठेकर, महिला भाजपाध्यक्ष निलिमाताई विनकर, माजी नगर परिषद सदस्य गजानन घावतोडे, अशोकरावजी कोठेकर, डॉ. विनकरे यांच्यासमवेत श्री नर्मदेश्वर महादेव सेवा समितीचे सर्व सदस्य प्रामुख्याने सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात मंदिर परिसरात वृक्ष पूजनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी वृक्षांना तिलक लावून, फुलांची अर्पण करून आणि जलसिंचन करून निसर्गाविषयी कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर विविध प्रजातींच्या रोपांचे वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी "एक व्यक्ती – एक वृक्ष" हा संदेश देत उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. यानंतर पारंपरिक होळी दहन करण्यात आले; मात्र यामध्ये प्लास्टिक, रबर किंवा पर्यावरणास हानीकारक वस्तूंचा वापर टाळण्यात आला. फक्त नैसर्गिक व सेंद्रिय साहित्य वापरून पर्यावरण पूरक होळी प्रज्वलित करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ.विजयकुमार ठेंगेकर यांनी केले. या उपक्रमाचे यशस्वी आयोजनाकरिता समितीचे पदाधिकारी सर्वश्री अमोल ठाकरे, संजय देशमुख, प्रणय अजमीरे,खुशाल बिजवे, दिपक



डाफ,सविता बागडे, सीमा अवधूत यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'राष्ट्रीय सेवा योजना'तून घडतो सुजाण नागरिक : प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे

प्रतिनिधी ४ मार्च

**पारवा :** "राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ शिबिरापुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, कर्तव्यभावना आणि नेतृत्वगुण रुजविणारे प्रभावी माध्यम आहे," असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे यांनी केले. बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय पारवाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय विशेष शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.




हे शिबिर २२ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान उत्साहात पार पडले. समारोपीय कार्यक्रमास डॉ. राहुल खंडारे (प्राचार्य, बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय, पांढरकवडा), सुनील ठाकरे (मुख्याध्यापक, आबासाहेब पारवेकर आश्रमशाळा, पहापळ), मोरेश्वर सरोदे (मुख्याध्यापक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, येळाबारा) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमापूजनाने झाली. स्वागतगीतानंतर स्वयंसेवकांनी शिबिरातील अनुभव कथन केले. मान्यवरांनी श्रद्धा, शक्ती, नेतृत्वगुण, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक जाणीव या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


शिबिरादरम्यान तरोडा पोड येथे ग्रामस्वच्छता मोहीम राबविण्यात आली. जलसाक्षरता, स्वच्छता, स्त्री-पुरुष समानता व स्त्री सक्षमीकरण विषयक जनजागृती दिंडी काढण्यात आली. वृक्षदिंडीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. ५३ कुटुंबांचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक सर्वेक्षण करण्यात आले. तसेच २५ घरांमध्ये फळझाडांची लागवड करून संवर्धनाचा संकल्प करण्यात आला.

दुपारच्या सत्रात विविध मान्यवरांनी जलसंधारण, संविधान जागर, व्यक्तिमत्त्व विकास आणि पर्यावरण या विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. संदीप अग्रवाल यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. जगदीश हेंडवे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## हर्ष पानसुरीया सीए परीक्षेत उत्तीर्ण

प्रतिनिधी ४ मार्च

**उमरखेड :** शहरातील प्रतिष्ठित व्यावसायिक महावीर उपहारगृहाचे संचालक शैलेश पानसुरीया यांचे चिरंजीव हर्ष शैलेश पानसुरीया याने सी ए परीक्षा उत्तीर्ण केली. त्याने आपल्या यशाचे श्रेय संपूर्ण परिवार, गुरुजन व आपल्या सातत्यपूर्ण अन् नियोजनबद्ध अभ्यासाला दिले आहे. हर्षच्या या यशाने सर्व स्तरातून हर्ष व परिवाराचे कौतुक व अभिनंदन होत आहे. त्यामुळे आनंदाचे वातावरण असून हा क्षण आमच्यासाठी अभिमानास्पद व गौरवपूर्ण असल्याचे त्याने सांगीतले आहे.



## जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार संगिता देवराव आत्राम रा. डोंगरखर्डा ता. कळंब जि. यवतमाळ यांनी त्यांचे स्वतःचे/नाते संबंधातील व्यक्तीच्या/ स्वतःचे जन्माची नोंद ग्राम पंचायत डोंगखर्डा, दप्तरी घेणे करिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार संगिता देवराव आत्राम याचा जन्म दिनांक 13.03.1974 रोजी मौजा - डोंगरखर्डा, येथे राहत्या घरी झाला असा अर्जदारांचा दावा आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे असल्याबाबत आवश्यक त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार, मेटीखेडा ता. कळंब उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ आणी ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मी अपर तहसिलदार, मेटीखेडा ता. कळंब प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणे कामीचा आदेश देणे करिता व गृह चौकशी करणे कामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगा व याचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्यतो पुरावा किंवा साक्षीदारांसह दंडाधिकारी, मेटीखेडा ता. कळंब यांचे न्यायालयात स्वत जातीने/वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामा प्रसिद्ध दिनांका पासून पंधरा दिवसाचे आत सादर करावे. उक्त कालावधीत कुठलाही आक्षेप/उजर/विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्म बाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणे बाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदी बाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

(शिक्का)

**दंडाधिकारी, तथा अपर तहसिलदार, मेटीखेडा, ता. कळंब.**

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

बुधवार दि. ४ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

आता मंत्रालयात आंदोलन




## नागरिकांचे रस्ते नव्हे तर जीवनच खड्ड्यात...

# शहरातील मार्ग, दाखवितात स्वर्ग !

## रस्त्यासाठी सागर कोकास पुन्हा उतरणार रस्त्यावर...

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

विकासाच्या नावावर हजारो कोटीचे कामे करूनही शहर भकास झाले आहे. नागरिकांना मुलभूत समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. शहरवासीयांना विविध समस्यांना तोंड घ्यावे लागत आहेत. शिवाय शहरातील रस्तेही १२ वर्षात ५ वेळा होवूनही रस्तेच नव्हे तर नागरिकांचे जीवनच खड्ड्यात गेले आहे. मुख्यमंत्री प्रचारासाठी आले असतांना शहरातील रस्ते तातपूर्ते का होईना रातोरात हातोहात दुरूस्त झाले. त्यामुळे मुख्यमंत्री साहेब रोजच या हो वाशीम शहराचा विकास करा हो असा आर्त टाहो सागर कोकास यांनी आंदोलन करून केला होते. या संबंधिचे सर्वप्रथम मुख्यमंत्री साहेब, तुमच्या मुळे तातपुरर्ते रस्ते दुरूस्त असे वृत्त लावून सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम लक्ष वेधले होते. रस्त्यासंबंधिच्या शेकडो बातम्याच्या वृत्त मालिका लावून धरल्या तरीही वाशीम शहरातील रस्ते नव्हेतर नागरिकांचे जीवनच खड्ड्यात गेले आहे. शहरातील मार्ग नसून अपघातामुळे अनेकांना स्वर्ग दाखवित आहे. त्यामुळे आता सागर कोकास पुन्हा रस्त्यावर उतरूण आंदोलन करणार आहेत.

वाशिम शहरातील रस्त्यांची अवस्था आता सहनशक्तीच्या पलीकडे गेली आहे. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पाटणी चौक, महाराणा प्रताप सिंह चौक ते रेल्वे स्टेशन आणि अकोला नाका रोड हे रस्ते विकासाचे नव्हे, तर भ्रष्टाचाराचे जिवंत पुरावे बनले आहेत. सर्वत्र खड्डे, धूळ, वाहतुकीचा गोंधळ आणि अपघातांचे सत्र सुरू असून नागरिकांचे जीव अक्षरशः धोक्यात आले आहेत. या रस्त्यांमुळे २००० हून अधिक व्यापाऱ्यांचा व्यवसाय ठप्प झाला असून ग्राहक दुकानांपर्यंत पोहोचू शकत नाहीत. उडणाऱ्या धुळीमुळे लहान मुले, वृद्ध नागरिक दमा व श्वसनविकारांना बळी पडत आहेत, तर खड्ड्यांमुळे दररोज अपघात होऊन संसार उघड्यावर येत आहेत. तरीही स्थानिक राजकीय नेते आणि प्रशासकीय यंत्रणा बघ्याची भूमिका घेत आहेत. या गंभीर परिस्थितीविरोधात सागर शंकर कोकास यांनी थेट देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून रस्त्यांची दुरुस्ती युद्धपातळीवर करण्याची मागणी केली आहे. वाशिमच्या विकासाचा निधी नेमका जातो कुठे, कामाचा दर्जा शून्य का, याचे उत्तर प्रशासनाला द्यावेच लागेल, असा थेट सवाल उपस्थित करण्यात आला आहे. वेळीच ठोस कारवाई न झाल्यास वाशिमकर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडतील, असा स्पष्ट आणि आक्रमक इशारा सागर कोकास यांनी दिला आहे. रस्त्ये होईपर्यंत शहरातील समस्या सुटेपर्यंत पाठपुरावा करून आंदोलन करणार असल्याचेही सागर कोकास यांनी सांगितले.

### वाशीमकर आता गप्प बसणार नाहीत - रस्ते नव्हेत, हे थेट मृत्यूचे सापळे






### समस्यांच्या गर्तेत जीवन जगताहेत वाशिमकर

२८ नोव्हेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री शहरात येणार म्हणून रस्त्यांची स्वच्छता झाली, रस्त्यावरील खड्डे बुजविले. मात्र, गेल्या कित्येक वर्षांपासून वाशिम शहारातील प्रत्येक नागरिक दररोज याच खड्ड्यांतून ये-जा करतोय, त्यांची हाडे दररोज खिळखिळी होताहेत. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय दररोज वाशिम ला आल्यास किमान येथील जनतेला चांगल्या सुविधा तरी मिळतील, अशी माफक अपेक्षा सागर कोकास यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर तातपूर्ते का होईना आता निवडणुकीसाठी दिखावा म्हणून मुख्यरस्त्यावरील कामांना सुरूवात झाली आहे. मात्र, सागर कोकास यांच्या आंदोलनामुळेच हे कामे होत असल्याची चर्चा वाशीम शहरात होती. आताच रस्त्याच्या समस्यांसाठी मंत्रालयात पाठपुरावा सुरू आहे.

### 'सिटी न्युज सुपरफास्ट' चा सततचा पाठपुरावा..

सर्व सामान्यांच्या समस्यांसाठी सांध्य दैनिक सिटी न्युज सुपरफास्ट शासन दखल घेईपर्यंत सततचा पाठपुरावा करीत असते. त्यामुळेच १३ वर्षात लोकांच्या मनामनातून घराघरात सिटी न्युज सुपरफास्ट पोहोचला आहे. शहरातील विविध समस्यांच्या प्रत्येक विषयांच्या हजारो वृत्त मालिकेची शृंखला सिटी न्युज सुपरफास्टने लावून धरली आहे. शहरातील समस्यांसाठी सदैव प्रथम पुढाकार घेवून समस्या मार्गी लागेपर्यंत शेकडो वृत्तातून वृत्त मालिकेच्या माध्यमातून सततचा पाठपुरावा करीत असल्याने सिटी न्युज सुपरफास्टने जनसामान्यांच्या मनात घराघरात स्थान निर्माण केले आहे. त्याचाच परिणाम म्हणून समस्यांच्या वृत्तांच्या कात्रनाचे बॅनर शहरात आंदोलनाच्या वेळी लागत असतात.

## थोडक्यात

### श्री गोविंद विद्यालयात पर्यावरण पूरक रंगनिर्मिती कार्यशाळा



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

जवळच असलेल्या श्री गोविंद विद्यालय पार्डी (ताड) येथे पर्यावरणपूरक रंग निर्मिती कार्यशाळेचे आयोजन विद्यालयाच्या वतीने करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन विद्यालयाचे मुख्याध्यापक शामराव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे हा या कार्यशाळेचा उद्देश आहे. कार्यशाळेत हळद, पळसफुल, काथ, काटेसावरफुल, चंदन, पालक, मेथी, टमाटे, बीट, मेहंदी, गेरू इत्यादी वनस्पतीचा वापर करून ओले व कोरडे रंग यांचे प्रात्यक्षिक कलाशिक्षक गोपाल गावंडे यांनी करून दाखविले. यामध्ये गौरी शामराव कुरवाडे, हर्षदा अनिल सावके, प्राजक्ता देवराव भगत, गायत्री ज्ञानेश्वर लांभाडे यांनी प्रत्यक्ष कोरडे व ओले रंग बनविले. रासायनिक रंगामुळे त्वचारोग, किडनी रोग, फुफुसाचे आजार, कर्करोग इत्यादी रोगांना आमंत्रण दिले जाते, तर पर्यावरणपूरक रंग यापासून मानवी शरीराला कुठलाही धोका नाही नैसर्गिक रंग ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे उद्घाटक शामराव ठाकरे यांनी केले. अशा उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता वाढून पर्यावरण संवर्धनाची जागृती वाढीस लागते असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष सदानंद ठाकरे यांनी केले. यानंतर विज्ञान शिक्षक जगदीश गावंडे बाळकृष्ण राऊत मीना नानुटे आकाश ठाकरे यांनी पर्यावरण पूरक रंगांचा वापर केला पाहिजे तसेच या उपक्रमाचे अनुकरण करून पर्यावरणाचे रक्षण करावे असे आवाहन करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन बाळकृष्ण राऊत यांनी तर प्रास्ताविक जगदीश गावंडे यांनी व आभार प्रदर्शन मीना नानुटे यांनी केले.

# 'त्या' शिक्षकांच्या वेतन स्थगितीचा आदेश मागे !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या आंदोलनाला यश

जिल्ह्यातील कॉपीप्रकरणी नाहक दोषी ठरवून फेब्रुवारी महिन्याचे वेतन काढु नये असे आदेश माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी काढले होते. याप्रकरणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, मुख्याध्यापक संघ, शिक्षकेतर संघाने शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर केलेल्या संयुक्त धरणे आंदोलनाला यश मिळाले असून शिक्षकांचे वेतन काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

उच्च माध्यमिक शालांत परीक्षेदरम्यान शिक्षणाधिकारी ससाने यांनी ९ शाळा, ५८७ विद्यार्थी व तब्बल ६० शिक्षकांवर कॉपी प्रकरणात सहभागी असल्याचे दोषारोपन करीत कारवाई केली होती, तसेच या प्रकरणातील शिक्षकांचे वेतन थांबविण्याचे आदेश शिक्षणाधिकारी यांनी दिले होते. याप्रकरणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे विभागीय कार्यवाह बाळासाहेब गोटे, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विनोद नरवाडे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सदस्य विनायक उज्जैनकर, विमाशि संघाचे जिल्हाध्यक्ष रामेश्वर अवचार, जिल्हा कार्यवाह कुलदीप बदर, शिक्षकेतर संघाचे जिल्हाध्यक्ष कैलास ढवळे, कार्यवाह रामराव कायंदे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन केले होते. तसेच याप्रकरणी गंभीर दखल विमाशि संघाचे आमदार सुधाकर आडबाले यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना संपर्क साधून शिक्षकांवर कारवाई करण्याचे अधिकार तसेच वेतन थांबविण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना नाहीत, त्यामुळे याप्रकरणी तात्काळ वेतन काढण्याचे आदेश न दिल्यास सभागृहात अधिकार्यांना निलंबित करण्याची मागणी करण्यात येईल असा इशारा दिला होता, परिणामी माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी या प्रकरणातील शिक्षकांचे वेतन काढण्याचे आदेश दिले आहेत.

## खाजगी शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पात्रतेत बदल

**शासनाचा सुधारणा प्रस्ताव**

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने खाजगी शाळांमध्ये कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत महत्त्वपूर्ण सुधारणा प्रस्तावित केली आहे. यासंदर्भातील मसुदा अधिसूचना दि. २५ फेब्रुवारी २०२६ रोजी राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहे.ही सुधारणा महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या अटी) नियमावली, १९८१ मध्ये करण्यात येत असून, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी अधिनियम १९७७ च्या कलम १६ अंतर्गत प्रस्तावित करण्यात आली आहे.या मसुद्यानुसार शाळांमधील शिक्षकेत्तर पदांसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता स्पष्ट करण्यात येणार आहे.कनिष्ठ लिपिक पदासाठी कोणत्याही शाखेतील पदवीधर उमेदवारासोबत मराठी टंकलेखन ३० शब्द प्रति मिनिट किंवा इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्रति मिनिट शासकीय प्रमाणपत्र आवश्यक राहणार आहे.ग्रंथालय संबंधित पदांसाठी बी.लिब.सायन्स किंवा पदवीसह ग्रंथालय विज्ञान पदविका अनिवार्य करण्यात येणार आहे. इतर शिक्षकेत्तर पदांसाठी किमान १२ वी उत्तीर्ण ही मूलभूत पात्रता निश्चित करण्यात येणार आहे.तसेच, तीन वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना ज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती देण्याची तरतूदही प्रस्तावित करण्यात आली आहे.शासनाने या सुधारणा मसुद्यावर हरकती व सूचना मागवल्या असून त्या दि. १२ मार्च २०२६ पर्यंत प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

### होळी रे होळी..घनकचऱ्याची होळी...

## मंगरूळपीर मध्ये स्वच्छतेसाठी अनोखे गांधीगिरी आंदोलन !



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर, येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये दि. ०२ मार्च २०२६ सोमवार रोजी शहरातील वाढत्या घनकचऱ्याच्या समस्येविरोधात मंगरूळपीर नगरपरिषदे तर्फे आरोग्य सभापती तथा उपनगराध्यक्ष अनिल गावंडे यांनी होळीनिमित्त अनोख्या पद्धतीने निषेध आंदोलन छेडले.

शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे 'होळी रे होळी... घनकचऱ्याची होळी! असा नारा देत घनकचऱ्याचे प्रतीकात्मक दहन करण्यात आले.

शहरामध्ये विविध ठिकाणी तसेच अनेक प्रभागां मध्ये घनकचऱ्याचे ढीग साचलेले असून साफसफाई केवळ थातूरमातूर होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. ठेकेदारां कडून योग्य पद्धतीने कचरा उचलला जात नसल्याने शहरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याची भावना नागरिकां मध्ये व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर शहरातील तील साचलेला घनकचरा एकत्रित करून त्याचे पूजन करण्यात आले व त्यानंतर निषेध म्हणून होळीनिमित्त त्याचे दहन करण्यात आले.

'घनकचरा ठेकेदाराच्या ढुंगणावर घनकचऱ्याची गोळी' अशा घोषणाबाजीद्वारे संताप व्यक्त करण्यात आला.यावेळी उपस्थित नागरिकांनी ही स्वच्छते बाबत तीव्र नाराजी व्यक्त करत तात्काळ प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली. शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली. 'एक कदम स्वच्छता की ओर' असा संदेश देत आंदोलनाचा समारोप करण्यात आला.

# संत सावता माळी पतसंस्थेच्या वाशीम शाखेचे उद्घाटन !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्था पुसद च्या वाशीम शाखेचे उद्घाटन माजी आमदार श्रीमती प्रज्ञाताई सातव यांच्या शुभ हस्ते रविवार दि. १ मार्च रोजी पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवक, माजी आमदार लक्ष्मणराव तायडे, अकोला हे होते तर अकोला जिल्ह्याचे सहाय्यक उपनिबंधक डॉ.प्रवीण लोखंडे, वाशीम चे नगराध्यक्ष मा.अनिल केंदळे, ड ड्बालरोगतज्ज्ञ डॉ.विजयराव कानडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी ज्योती पिठावर पतसंस्थेचे संस्थापक, अध्यक्ष आत्माराम जाधव, उपाध्यक्ष रतिराव बोरगडे सर, वाशीम शाखेचे अध्यक्ष केशवराव खासबागे, मालेगाव शाखा अध्यक्ष प्रा.प्रकाश कापुरे, जि.प.शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष विजय मनवर , उपाध्यक्ष राजुभाऊ मते, साने गुरुजी सेवासंघाचे जिल्हाध्यक्ष मधुकरराव महाले, नगरसेवक गजुभाऊ लांडगे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाखा अध्यक्ष केशवराव खासबागे यांनी केले. भविष्यात या पतसंस्थेने आमच्या हिंगोली जिल्ह्यात सुद्धा शाखा विस्तार करावा अशी सूचना करुन त्यासाठी आम्ही सर्व प्रकारचे सहकार्य करू अशी ग्वाही दिली.' हातात घेतलेले कार्य चांगल्या रितीने पुर्ण करुन शेवटास न्यायचेच ! ' हा आत्माराम जाधव यांचा स्वभावगुण असल्याने नौकरी सांभाळून मागील अठरा वर्षांपासून त्यांनी पतसंस्थेच्या एका शाखेचे रुपांतर नऊ शाखेत करण्याचे धाडस केले आहे असे गौरवोद्गार माजी आमदार लक्ष्मणराव तायडे यांनी अध्यक्षीय भाषणात केले. यवतमाळ जिल्ह्यातील पाच शाखा उत्कृष्टरित्या चालविल्या त्यामुळेच आता वाशीम जिल्ह्यातील ग्राहकांच्या व ठेवीदारांच्या सेवेसाठी जिल्ह्यात चार शाखांची सुरुवात ही पतसंस्था करत आहे. यापुढेही या पतसंस्थेकडून संपूर्ण महाराष्ट्रात शाखा स्थापन करण्यात येऊन या पतसंस्थेचे बॅंकेत रुपांतर व्हावे असा आशावाद आपल्या अध्यक्षीय भाषणात माजी आमदार लक्ष्मणराव तायडे यांनी व्यक्त केला.उद्घाटन समारंभाचे उत्कृष्ट संचलन श्री.संभाजी साळसुंदर सरांनी केले तर प्रा.दिपक उल्हेमाले यांनी सर्व मान्यवरांचे आणि उपस्थितांचे हार्दिक आभार व्यक्त केले.पतसंस्थेच्या वाशीम शाखेचा उद्घाटन समारंभ यशस्वीपणे पार पाडण्यासाठी नगराध्यक्ष अनिल केंदळे व डॉ.विजयराव कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष केशवराव खासबागे, संचालक चंद्रकांत भांदुर्गे, नागेश काळे, शंकरराव वानखेडे, मदन जाधव, प्रा.अनील मडके, शंकरराव इंगोले, ज्ञानेश्वर वाशीमकर, उमेश मोहळे, मनीष चिपडे, अरविंद उल्हामाले, रवींद्र इंगोले, मदन पिंजरकर, रामभाऊ गाभने, अजिंक्य गोरे, महादेव हरकळ, संदीप भडके, प्रभाकर चवाळे, पवन जोगदंड, श्रीमती रेखाताई वानखेडे, सौ.सविता मोहळे, सौ.राधाताई ठेंगडे, पतसंस्थेच्या पुसद शाखेचे व्यवस्थापक शिवाजी सारंगे, लिपिक विशाल पोले, सौ.प्रिती साबळे, कु.रिंकू वाघमारे, सुबोध योगी, संदीप मगर, वाशीम शाखेचे व्यवस्थापक संजय रंधवे, लिपिक शिवम भांदुर्गे, दिपक इंगळे हे कर्मचारी व अनेक सभासदांनी अथक परिश्रम घेतले.

# स्मशान होलिकोत्सवात केली व्यसनाची होळी, अन् साफसफाई !

### दोन तास स्वच्छता अभियान : संकल्प फाऊंडेशनचा २० वर्षापासुन निरंतर उपक्रम

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●



सामाजीक कार्यात अग्रेसर असलेल्या संकल्प मल्टीपर्पज फाऊंडेशनच्या वतीने २ मार्च रोजी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही होळी सणाच्या पार्श्वभूमिवर मोक्षधाम स्मशानभूमिमध्ये स्मशान होलीकोत्सव कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या आधी तब्बल दोन तास अथकपणे स्वच्छता अभियान राबवून स्मशानभूमिचा परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर स्मशान होलीकोत्सवात व्यसनाची होळी करण्यात आली. संकल्प फाऊंडेशनच्या वतीने गेल्या २० वर्षापासून हा उपक्रम अव्याहत व यशस्वीपणे सुरु आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून व्यसनमुक्ती व स्वच्छतेचा संदेश देण्यात येत आहे.

या कार्यक्रमात प्रारंभी स्मशानभूमिचा संपूर्ण परिसर खराट्याने झाडून स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर गुटखा, विडी, सिगारेट, तंबाखु, दारु, गांजरगवत, प्लॉस्टीक पन्न्या आदींची होळी पेटविण्यात आली.

या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे हे वीसावे वर्ष होते. उपक्रमाचे मुख्य आयोजन संकल्प मल्टीपर्पज फाऊंडेशनचे अध्यक्ष सुशील भिमजीयाणी यांनी केले होते. या उपक्रमात अॅड. सुरेश टेकाळे, राजु धोंगडे, आशिष इंगोले, रवि गुप्ता, विशाल पट्टेबहादुर, हर्षवर्धन टेकाळे, रवि हजारे, विष्णू इंगळे, नवनिर्माण महिला बहूउद्देशिय संस्थेच्या अध्यक्षा सौ. वृषाली टेकाळे, दत्तगुरु बहूउद्देशिय संस्थेच्या अध्यक्षा रुपाली देशमुख, दिव्यश्री टेकाळे, पत्रकार मनोज जैस्वाल, शंकरराव देशमुख, गणेश डुबे, उमेश कथले, बंडु गव्हाणे, सखाराम भडके, प्रविण इंगोले, प्रदीप पट्टेबहादुर, भगवान वाकुडकर यांच्यासह तरुण मंडळींनी या समाजसेवी उपक्रमात सहभाग घेवून यशस्वीरित्या पार पाडला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

बुधवार, दि. ४ मार्च २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# रंगोत्सवाची रंगत वाढवणारे मूर्ख संमेलन साजरे

प्रतिनिधी ४ मार्च

**अकोला :** धुळवडीच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात ५४ वे मूर्ख संमेलन पार पडले. या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाची शहरवासीयांना प्रतीक्षा असते. स्व. रामकिशोर श्रीवास (गुरुजी) यांची परंपरा डॉ. कोमल राजेंद्र श्रीवास आणि आयोजन समितीचे सदस्य पुढे नेत आहेत.






## ◆ शहरातील कलावंतांनी उपस्थितांना रिझवले

शाहीर वसंतदादा मानवटकर, ॲड. अनंत खेळकर, तुलसी सांळुके, महादेवराव भुईभार, दर्शनी राजुरकर (मुंडगांव), उमेश शर्मा, रवी खंडारे (कातखेड), शिवलाल माझोडकर, विशाल वाघमारे, भारत वरोटे, प्रशांत भोंडे, अंध विद्यालय चमू, विक्की मेश्राम, ऋषिकेश वरोटे, हिंमत ढाले, देवीदास चव्हाण, हरीश पारसाणी, नामदेव गवळी, विशाल राखोंडे, एस.डी. सदांशिव, किशोर बळी, राजाराम आठवले, गुलाबराव अंभोरे, प्रशांत गवई, रमण वाघमारे, पवन शिंगनारे, राधिका शिगनारे, साळुंके, जान्हवी पाटील, मंगला खडे यांनी हास्य व्यंग कविता, नाटिका, जादूचे प्रयोग सादर केले. शाहीर वसंतदादा मानवटकर यांनी सादर केलेल्या पांढर पायी पात्राने चांगलीच खसखस पिकवली. रसिकांना उत्तमोत्तम सादरीकरणाची मेजवानी मिळाली. तत्पूर्वी सिटी कोतवाली मागील परिसरातून मुर्खाधिराज विशाल प्रदीप शर्मा यांची मिरवणूक निघाली.

वाजतगाजत मिरवणूक डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृहात पोहोचली. गर्दभ वंदना तसेच मुर्खाधिराज यांचे परंपरागत पद्धतीने स्वागत झाले. आणि संमेलनाला सुरुवात झाली. सर्वेशचंद्र कटियार निमंत्रक होते. संचालन प्राचार्य डॉ. रामप्रकाश वर्मा यांनी केले. दीपक पातालबंसी यांनी आभार मानले. कलावंतांचे डॉ. कोमल श्रीवास आणि मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सादरीकरणाला दाद दिली.

# श्री संत गाडगे बाबा यांच्या 150 व्या जयंती वर्षानिमित्त गाडगे बाबा प्रभाग स्वच्छता अभियान राबविणार – महापौर नीता ठाकरे

प्रतिनिधी ४ मार्च




**अकोला :** संत गाडगे बाबा यांनी राष्ट्राला कृतीतून समाज कल्याण, स्वच्छता, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा दूर करणे, शिक्षणाचा संदेश दिला. आपले घर स्वच्छ ठेवणे म्हणजे स्वच्छता नव्हे ती सवय व्हायला पाहीजे म्हणुन श्री संत गाडगे बाबा यांच्या १५० व्या जयती वर्षा निमित्य नागपूर शहरा मध्ये'श्री संत गाडगे बाबा प्रभाग स्वच्छता अभियान'राबविणार असल्याचे महापौर निताताई ठाकरे यांनी सांगितले.

संत गाडगे बाबा बहुउद्देशिय सेवा संस्था व्दारा आयोजित श्री संत गाडगे बाबा यांची १५० वी जयंती मोठ्या उत्सवात शिक्षक सहकारी बँक सभागृह येथे साजरी करण्यात आली. सर्वप्रथम श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पुजन समाज प्रबोधनकार सप्तखंजरी वादक श्री सत्यपाल बाबा व महापौर निताताई ठाकरे यांच्या हस्ते करुण कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. या प्रसंगी आमदार प्रवीण दटके, धोबी समाजाचे नेते संजय भिलकर, तेलगु धोबी समाजाचे प्रदेश अध्यक्ष गोपी अण्णा चाकर, झरीया धोबी समाजाचे छोटु निर्मलकर, गणेश रामटेककर, किशोर चव्हाण, श्याम तुरके, परिक्षित चिलाटे, नितिन रामटेककर, दिनेश सुगनपात्रे, भैय्यालाल ताकोते, भिमराव पात्रीकर, शरद ताकोते, भिमलाल दुधमोगरे, अशोक चौरसिया, शंकरराव श्रीपात्रे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते.



केंद्र सरकारने गाडगे बाबा यांच्या नावाने स्वच्छता अभियान सुरु करावे. तत्कालीन गृहमंत्री आर आर. पाटील यांनी महाराष्ट्रा मध्ये स्वच्छता अभियान राबविले होते. याचा सकारात्मक परिणाम नागरीकांन मध्ये दिसुन आला. मात्र ही योजना आज बंद पडली आहे. म्हणुन महाराष्ट्र सरकारने श्री संत गाडगे बाबा यांच्या १५० वी जयंतीचे औचित्य साधून ती सुरू करावी अशी मागणी केली.

# भ्रष्टाचार निर्मूलन रस्ते संघर्ष समिती तर्फे ६ मार्च रोजी धरणे आंदोलन



प्रतिनिधी ४ मार्च

**अकोला :** उगवा फाटा ते खेकडी नवथळ रस्त्याचे डांबरीकरण व दोन पुल रस्त्याचे कामासाठी निधी मंजूर असून सुद्धा अद्याप पर्यंत कामे सुरू करण्यात आली नाही. वारंवार लेखी निवेदन देण्यात आले. अद्याप काम सुरू करण्यात आले नाही त्यामुळे ६ मार्च रोजी भ्रष्टाचार निर्मूलन रस्ते संघर्ष समिती कडून सार्वजनिक बांधकाम विभाग समोर धरणे आंदोलन करण्यात येईल.

या महत्त्वाच्या रस्त्यासाठी निधी उपलब्ध असून देखील काम सुरू केले जात नाही. त्यामुळे नागरिक संताप व्यक्त करीत आहेत. वरिष्ठांना निवेदन पाठवून ही समस्या त्यांच्या पर्यंत पोहचवली आहे. याकडे लक्ष द्यावे आणि कामाला विनाविलंब सुरूवात करावी अशी मागणी केली जात आहे.

# स्व. तुकाराम बिडकर त्रिस्तरीय पुरस्कार जाहीर

## ◆ शिक्षण क्षेत्रात ललित काळपांडे, कला क्षेत्रात निलेश जळमकर तर क्रीडा क्षेत्रासाठी सदानंद जाधव यांचा समावेश

प्रतिनिधी ४ मार्च





**अकोला :** स्व. तुकाराम बिडकर ग्राम विकास प्रतिष्ठान ने ज्ञान, कला क्रिडा या तीन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणा-या वेगवेगळया व्यक्तींना त्रि स्तरीय पुरस्कार जाहीर केले आहे. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणारे ललित काळपांडे यांना ज्ञानरत्न पुरस्कार, कला क्षेत्रात उत्कृष्ठ काम करणारे निलेश जळमकर यांना कलारत्न पुरस्कार तर क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे सदानंद जाधव यांना क्रीडारत्न पुरस्काराची घोषणा प्रतिष्ठानचे अध्यक्ष शत्रुघ्न बिडकर यांनी आज केली. गुरूवार, ५ मार्च रोजी दुपारी १ वाजता प्रमिलाताई ओक सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

स्व. तुकाराम बिडकर यांनी ज्ञान, कला, क्रीडा तिनही क्षेत्रात त्रिसुत्री घेवुन महाराष्ट्रातील ग्रामीण भागात युवक युवतींना समाज निर्मिती व राष्ट्र निर्मिती या मुळ प्रवाहात आणण्याचे काम केले. त्यांच्या कार्यास पुढे नेणा-या व्यक्तीस त्यांच्या नावाने पुरस्कार देवून समाज कार्य येणा-या पिढीकडुन अविरत चालू राहावे यासाठी पुरस्काराची सुरुवात केली असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष शत्रुघ्न बिडकर यांनी सांगितले. ललित काळपांडे यां शिक्षण क्षेत्रात ग्रामीण भागातील १० हजार अभियंते तर ७ हजार डॉक्टर निर्माण केले असुन विविध शैक्षणिक उपक्रम राबविले. कलारत्न पुरस्काराचे मानकरी ठरलेले निलेश जळमकर यांनी अनेक सामाजिक व वैचारिक चित्रपटाची निर्मिती करून समाज प्रबोधनाचे कार्य केले आहे. ज्यामध्ये संत गाडगे बाबाच्या जीवनावर 'डेबू,' वसंतराव नाईक यांच्या जीवनावर 'महानायक', महात्मा फुलेंच्या जीवनावर 'सत्यशोधक', शेतक-याचा व्यथा मांडणार 'आसूड', राजकीय व्यंग व व्यथा सोडवणारा 'नागपूर अधिवेशन' सारख्या चित्रपटांची निर्मीती केली आहे. क्रिडारत्न पुरस्काराचे मानकरी ठरलेले सदानंद जाधव यांनी 'एकलव्य' कला अकॅडमीची स्थापना करून अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू व प्रशिक्षक तयार केले. स्व. तुकाराम बिडकर यांची ०५ मार्च रोजीच्या जयंती समारंभात मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरीत करण्यात येत आहेत. या प्रसंगी संस्थेचे मार्गदर्शक प्रकाश बिडकर, गजानन म्हैसने, गजानन इंगळे, प्रा. सदाशिव शेळके, डॉ. रमेश बरडे, महादेवराव साबे, गजेंद्र काळे, राजेंद्र जळमकर, फाउंडेशन पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# इनकम टॅक्स चौकात अग्निशमन दलाच्या गाडीने दोघांना उडविले !

प्रतिनिधी ४ मार्च

**अकोला :** शहरातील इनकम टॅक्स चौकात जीव वाचविणाऱ्या अग्निशमन दलाच्या गाडीने दुचाकीवरील दोघांना उडविले. हा अपघात धुलीवंदनाच्या दिवशी झाल्याने या उत्साहावर विरजण पडले आहे. यातील एका जणाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती असून दुसराही जखमी झाला आहे.

अकोला महानगरपालिकेची अग्निशमन दलाची गाडी क्र. एमएच ३० एच ५२२५ ही गोरक्षण रोडने आग विझविण्यासाठी जात होती. यावेळी दुचाकी क्र. एमएच बीजी

## एकाची प्रकृती चिंताजनक, दुसराही जखमी

७७७४ या दुचाकीला इनकम टॅक्स चौकात जबर धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीवरील मनोज चंद्रकांत रोकडे (५०) रा. मलकापूर अकोला, हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना तातडीने सर्वोपचार रूग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. त्यांच्या चेहरा गंभीर मार लागला असून, नाकाची हड्डीही मोडली आहे. तसेच दुसराही जखमी झाला असल्याची माहिती आहे.

# अकोट फाईल परिसरात जुन्या वादातून दोन गटात हाणामारी ; 3 जण गंभीर जखमी

प्रतिनिधी ४ मार्च

**अकोला :** अकोट फाईल पोलिस स्टेशनच्या हद्दीत जुन्या वादातून दोन समुदायांच्या तरुणांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या घटनेत तीन जण गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर जिल्हा सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अकोला शहरात रंगपंचमीचा सण दिवसभर शांततेत पार पडला. मात्र, रात्रीच्या सुमारास अकोट फाईल परिसरात जुन्या वैमनस्यातून दोन गट आपसात भिडले. या हाणामारीत तिघे जखमी झाल्याने सणाच्या आनंदावर विरजण पडले आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोन्ही गटांमध्ये पूर्वीही वाद झाले होते. त्याच जुन्या वादाची ठिणगी पुन्हा पडली आणि त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. एका गटाचा दुसऱ्या गटातील 'शोएब' नावाच्या तरुणाशी वाद सुरू झाला होता. दरम्यान, हा वाद सोडवण्यासाठी आणि मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या लोकांवरही हल्ला करण्यात आला.

या हल्ल्यात अख्तर अहमद कुरेशी, नावेद अहमद,

इरफान खान जखमी झाले. या तिघांना प्राथमिक उपचारानंतर तातडीने सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेनंतर आधी अकोट फाईल पोलीस स्टेशनसमोर आणि नंतर सर्वोपचार रुग्णालय परिसरात नागरिकांनी व जखमींच्या नातेवाईकांनी मोठी गर्दी केली होती. जुन्या वादामुळे वारंवार घडणाऱ्या अशा घटनांनी परिसरात चिंतेचे वातावरण आहे. सध्या परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्रकरणी दुसऱ्या गटातील एका व्यक्तीला अटक करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करत आहेत. परिसरात सध्या शांतता असून 'नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये,' असे आवाहन अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी यांनी केले आहे.

# धामणदरी तांडा येथे बंजारा पारंपरिक होळी उत्साहात साजरी

प्रतिनिधी ४ मार्च

**बार्शीटाकली :** धामणदरी येथे बंजारा समाजाची पारंपरिक होळी मोठ्या उत्साहात व भक्तीभावात साजरी करण्यात आली. तांड्यात पारंपरिक वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर आणि बंजारा गीतांनी वातावरण भारावून गेले.होळीच्या निमित्ताने समाजबांधवांनी पारंपरिक रीतीरिवाजांनुसार होळी प्रज्वलित केली. यावेळी बंजारा समाजातील जुनी परंपरा जपत लहान मुलांनी घराघरांत जाऊन 'फगवा मागितला' ही परंपरा उत्साहात पार पाडली. ग्रामस्थांनी आनंदाने फगवा देत या परंपरेला प्रतिसाद दिला. तसेच कार्यक्रमात गीत महंत यांच्या उपस्थितीत पारंपरिक बंजारा भजन व गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत बंजारा गीतांवर सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमामुळे सामाजिक ऐक्य व बंधुभाव अधिक दृढ झाला असून तांड्यात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# पाणी टंचाई जाणवू लागली, टँकरद्वारे पाणी पुरवठा




प्रतिनिधी ४ मार्च

**अकोला :** शहरात उन्हाळ्याची चाहूल लागताच पाणीटंचाईची समस्या तीव्र होऊ लागली आहे. अनेक भागांत नळाद्वारे होणारा पाणीपुरवठा कमी झाल्याच्या तक्रारी नागरिकांकडून पुढे येत आहेत. शहरातील काही परिसरांमध्ये जलसाठे घटले असून, बोअरवेलही आटण्याच्या स्थितीत आहेत. परिणामी नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी पर्यायी व्यवस्थेचा आधार घ्यावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर खासगी पाणीपुरवठा करणाऱ्या टँकरची वर्दळ शहरातील विविध गल्लीबोळांत वाढलेली दिसून येत आहे. सकाळपासूनच टैंकरभोवती नागरिकांची गर्दी होत असून, पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. काही भागांत दररोज टँकर बोलविण्याची वेळ येत असल्याने घरगुती खर्चातही वाढ होत आहे. दरवर्षी उन्हाळ्याच्या सुरुवातीला उद्भवणारी ही परिस्थिती प्रशासनासमोर मोठे आव्हान ठरत आहे. दीर्घकालीन उपाययोजना म्हणून जलसंधारण, पावसाचे पाणी साठवण आणि पाणी वापरात काटकसर करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे

# लिनेस क्लब ऑफ अकोलाची होळी निमित्त सभा आणि 'माता-कन्या' प्रकल्प संपन्न

प्रतिनिधी ४ मार्च








**अकोला :** रतनलाल प्लॉट स्थित सेंटर प्लाजा हॉटेल मध्ये २७ फेब्रुवारी रोजी लिनेस क्लब ऑफ अकोलाची होळीनिमित्त विशेष सभा उत्साहात पार पडली. याप्रसंगी होळीशी संबंधित गीत स्पर्धा, राधा-कृष्ण रासलीला, नृत्य आणि वेशभूषा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्यांना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले. तसेच, लि. लिलाजी मालपानी यांनी 'बुरा ना मानो होली है' या विषयावर आधारित हास्यव्यंग आणि गीतांच्या माध्यमातून उपस्थितांची मने जिंकली.

'माता-कन्या' प्रकल्प आणि आरोग्य जागरूकता या सभेमध्ये 'माता-कन्या' प्रकल्पांतर्गत कर्करोगतज्ज्ञ डॉ. प्रेरणा चांडक, डॉ. निर्मला चांडक, डॉ. पूर्वा जयस्वाल, आणि प्रीती जयस्वाल यांना सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. पूर्वाजी जयस्वाल यांनी सुमारे ५० महिलांना स्लाईड शोच्या माध्यमातून कर्करोग आणि विशेषतः स्तनाच्या कर्करोगाबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी आजाराची लक्षणे, बचावाचे उपाय आणि उपचारांबाबत मार्गदर्शन केले. हा प्रकल्प 'शून्य बजेट प्रकल्पा'त समाविष्ट आहे.

ऑल इंडिया लिनेस क्लबच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. मंजिरी कुलकर्णी यांनी हा प्रकल्प आपल्या सेवा उपक्रमांमध्ये समाविष्ट करण्याचे आवाहन केले आहे.




या सभेत क्लबच्या अध्यक्षा राजश्री समनपूरे यांचे जावई अरुणकुमार वल्लूरू (जे ऑस्ट्रेलियाहून भारतात येऊन सेवा करण्याची इच्छा ठेवतात), त्यांनी १०,००० रुपयांची देणगी देऊन दोन गरजू व्यक्तींना 'जयपूर फूट' देण्याचे सामाजिक कार्य केले. कार्यक्रमाचे यशस्वी संचालन कोषाध्यक्ष लि. अल्काजी उमाळे यांनी केले, तर सचिव अहवाल क्लब सचिव लि. वनिता बिजवे यांनी सादर केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रांताध्यक्ष लि. कल्पनाजी देशमुख, लि. हरविंदर कौरजी सेठी, लि. आशाजी विरवानी, लि. सुनंदाजी गुप्ता, लि. स्वातीजी झुनझुनवाला, लि. रतनमालाजी रुईकर, रिजन चेअरपर्सन ममताजी सूर्या, लि. दिना शाह, लि. चंदाजी जयस्वाल, लि. इंद्राणी देशमुख, लि. इंदुजी तिवारी, लि. दिव्याजी देशमुख, लि. प्रेमाजी मुंधडा, लि. श्रद्धा जोशी, लि. उमाजी बाजोरिया, लि. स्वातीजी अग्रवाल, लि. सुनीता तोलानी, लि. अनिताजी केडिया, लि. धर्मिष्ठाजी वरवारिया, लि. सुलेखाजी गुप्ता, लि. शीतलजी अग्रवाल आणि लि. आशाजी मोटवानी यांची प्रमुख उपस्थिती होती. लि. सुनीता तोलानी, लि. काजल राजपाल, लि. रेखा हिरवानी, लि. मुक्ता धैई, लि. जयश्री भारती, लि. करिश्मा गुरबानी, लि. अंकिता गुप्ता आणि लि. लक्ष्मी तोलानी यांनी उपक्रमासाठी सहकार्य केले.

वाढदिवस शुभेच्छा



पश्चिम विदर्भातील सर्वाधिक लोकप्रिय चॅनल आरआरसी नेटवर्क व सिटी न्यूज सुपरफास्टचे कारंजा तालुका प्रतिनिधी

किरण क्षार

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा

RRC NETWORK

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

सिटी न्यूज सुपरफास्ट

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK